cmyk

## संपादकीय

### २५० वर्षांची अमेरिका

४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्याची घोषणा करून अमेरिकेने ब्रिटिश वसाहतवादाला आव्हान दिले. आज, २५० वर्षांच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अमेरिकेकडे जग एका महासत्तेच्या रूपात पाहते. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, संरक्षण, शिक्षण आणि नवोपक्रम या क्षेत्रांत अमेरिकेने जागतिक नेतृत्व निर्माण केले आहे. परंतु हा प्रवास केवळ यशाचा नाही; तो संघर्ष, अंतर्विरोध, सामाजिक बदल आणि लोकशाहीच्या सततच्या परीक्षांचाही इतिहास आहे. भारताच्या दृष्टीने अमेरिकेच्या या प्रवासाकडे केवळ कौतुकाने नव्हे, तर चिकित्सक नजरेने पाहण्याची गरज आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०५ | रविवार दि.०५ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### संरक्षण दलांना मिळणार ५२ हजार कोटींचे बळ

नवी दिल्ली संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण खरेदी परिषदेच्या बैठकीत सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदी योजनांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत लष्कर, नौदल आणि हवाई दलाला अत्याधुनिक शस्त्रे, क्षेपणास्त्रे, अँटी–ड्रोन प्रणाली, हवाई संरक्षण प्रणाली आणि पाळत ठेवणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील. यामुळे देशाची युद्धसज्जता आणि सुरक्षा क्षमता पूर्वीपेक्षा अधिक बळकट होणार आहे. लष्करासाठी आकाश तरंग ही अँटी–ड्रोन इलेक्ट्रॉनिक प्रणाली, खांद्यावरून डागता येणारी रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली, मध्यम पल्ल्याची हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली, अतिशय कमी पल्ल्याची हवाई संरक्षण प्रणाली, रणगाड्यांसाठी सुरक्षा प्रणाली आणि जेटआधारित कामिकेज (आत्मघाती) ड्रोन प्रणालीच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे.

### आरएसएसचे वक्तव्य हे मगरीचे अश्रू – काँग्रेस

नवी दिल्लीः अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील देणगीच्या चोरीवर आरएसएसने केलेले वक्तव्य हे मगरीचे अश्रू आहे, अशा शब्दांमध्ये काँग्रेसने शनिवारी (दि. ४) हल्लाबोल केला. भाजप–आरएसएस हे श्रीरामाचे उपासक नसून सनातन धर्म आणि रामभक्तांचा विश्वासघात करणारे व्यापारी आहेत, असा आरोपही काँग्रेसने केला आहे. काँग्रेस कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत, उत्तर प्रदेश काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेत्या आराधना मिश्रा म्हणाल्या की, आरएसएस–भाजप मगरीचे अश्रू ढाळून या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु रामभक्त त्यांना माफ करणार नाहीत. त्या म्हणाल्या की, दत्तात्रेय होसबळे यांनी टेलिप्रॉम्प्टरवर लिहिलेले निवेदन वाचले, परंतु यामुळे आरएसएस या गंभीर पापापासून आणि जबाबदारीतून मुक्त होत नाही. त्यांनी या संपूर्ण प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मौनावरही टीका केली.

### राम मंदिर दानअपहार आरोपीची कबुली !

अयोध्या : अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिरातील दानचोरी प्रकरणामुळे देशभरात मोठी खळबळ उडाली असून, या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. तसेच त्याने पोलीस चौकशीत अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. ज्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात एकूण आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. ४५ दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज आरोपी अविनाश शुक्ला याला दाखवण्यात आले. त्यावेळी त्याने आपला गुन्हा केल्याची कबुली दिली. चौकशीत अविनाशने सांगितले की, चोरीच्या पैशांतून त्याने ब्रेझा कार खरेदी केली, गावात घर बांधले आणि भावालाही मोठी रक्कम दिली. संशय येऊ नये म्हणून कार स्वतःच्या नावावर न घेता सरकारी शिक्षक असलेल्या भाऊ अभिषेकच्या नावावर खरेदी केल्याचेही त्याने पोलिसांना सांगितले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०४ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८३.५० क्विंटल | २,२४१ | २,६०० | २,४७० |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.५० क्विंटल | २,३०० | ४,५६० | ३,०५१ |
| मका/लोकल: ४०.५० क्विंटल | २,२०० | २,२५६ | २,२२८ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: २५.०० क्विंटल | २,४११ | ३,३०१ | २,७०० |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५५२ | ५,५२६ |


# कापूस क्षेत्र वाढले; पण अधिकृत बियाण्यांची विक्री ठप्प!

## राज्यात एचटीबीटी बियाण्यांचा काळाबाजार पुन्हा चर्चेत

पुणे । प्रतिनिधी

**यंदा कापूस लागवडीचे क्षेत्र लक्षणीय वाढले असतानाही अधिकृत कृषी सेवा केंद्रांवरील कापूस बियाण्यांच्या विक्रीत अपेक्षित वाढ झालेली नाही. लागवडीचे क्षेत्र आणि अधिकृत विक्री यामधील तफावत पाहता प्रतिबंधित असलेले एचटीबीटी कपाशी बियाणे छुप्या मार्गाने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचा संशय कृषी क्षेत्रात व्यक्त केला जात आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या देखरेखीसह बियाण्यांच्या अनधिकृत विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

राज्यात एचटीबीटी कपाशी बियाण्यांच्या विक्रीला अद्याप परवानगी नसतानाही दरवर्षी या बियाण्यांचा गुप्तपणे



पुरवठा होत असल्याच्या तक्रारी समोर येत असतात. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे यंदा आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाला चांगला दर मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी कापूस लागवडीला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे कापसाखालील क्षेत्र वाढले असले तरी अधिकृत कृषी सेवा केंद्रांवरील बियाण्यांची विक्री त्यानुसार वाढलेली दिसून आलेली नाही. कृषी क्षेत्रातील जाणकारांच्या मते,

▶▶ पान २ वर

### आमिष दाखवून विक्री

माहितीनुसार, काही भागांत गावांतील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत एचटीबीटी बियाणे पोहोचविण्याचे जाळे कार्यरत असल्याची चर्चा आहे. बियाण्यांच्या विक्रीवर आकर्षक कमिशन, अधिक विक्री करणाऱ्यांना दुचाकी, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा रोख प्रोत्साहन देण्याचे आमिष दाखवून अनधिकृत विक्री वाढवली जात असल्याचे आरोप केले जात आहेत. या व्यवहारात मध्यस्थांची साखळी तयार झाल्याने प्रशासनाला कारवाई करणे अधिक कठीण होत असल्याचेही बोलले जात आहे.

# इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी होते!

## ● केंद्र सरकारची कबुली




नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशात पर्यावरणपूरक इंधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून ई–२० (२० टक्के इथेनॉलमिश्रित) पेट्रोलचा वापर वाढवला जात आहे. मात्र, या इंधनामुळे वाहनांच्या मायलेजवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो, अशी कबुली केंद्र सरकारने पहिल्यांदाच दिली आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मात्र, मायलेजमधील ही घट अत्यंत किंचित असेल आणि ती केवळ इथेनॉलमुळेच नाही, तर इतर अनेक घटकांवरही अवलंबून असू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

हरदीपसिंह पुरी यांनी मायलेज कमी होण्याच्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सांगितले की, इथेनॉलचा वापर आता रेसिंग कार्समध्येही मोठ्या प्रमाणावर केला जातो, हे आता सिद्ध झाले आहे. यामुळे वाहनाचे ऑक्सिलेशन (पिक–अप) सुधारते आणि इंजिनमधील नॉकिंगची (खडखडाट) समस्याही कमी होते. त्यामुळे मायलेजमध्ये जर थोडी घट झाली, तर त्याला कारमधील इतर तांत्रिक गोष्टी किंवा ड्रायव्हिंगची पद्धत यासारखे इतर अनेक घटक कारणीभूत असू शकतात. वाहन उत्पादक संघटना आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यासारख्या सर्वसंबंधित संस्थांशी चर्चा करूनच ई–२० पेट्रोल बाजारात आणले गेल्याचे त्यांनी सांगितले. भारतातील वाढती बाजारपेठ पाहता सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानाला येथे वाव आहे. देशात इलेक्ट्रिक वाहने, सीएनजी, हायब्रिड आणि बायोफ्युएल वाहने एकत्र चालू शकतात. सरकारने २२ टक्के ते ३० टक्क्यांपर्यंतच्या इथेनॉल मिश्रणासाठी मानके निश्चित केली असून त्यांना उत्पादन शुल्कातून सूट दिली आहे. मात्र, याचा अर्थ लगेच जास्त

▶▶ पान २ वर

# राम मंदिराचा पैसा खासदार फोडण्यासाठी

## उद्धव ठाकरेंचा भाजपवर आरोप



मुंबई । प्रतिनिधी

राम मंदिराच्या आंदोलनासाठी कारसेवकांनी सोसलेले अत्याचार, रक्त आणि कष्टाचे भांडवल करून अमर्याद सत्ता भोगणाऱ्या भाजपच्या काळात थेट प्रभू श्रीरामाच्या मंदिरातच दरोडा टाकला जात आहे. हिंदुत्वाचा बुरखा घालून राम मंदिर लुटणाऱ्यांचा पैसा इतर राजकीय पक्ष आणि आमदार–खासदार फोडण्यासाठी वापरला जात असल्याचा घणाघाती आरोप शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केला.

### ‘घोटाळ्यातील आरोपींना मंत्रिपद देऊ नये’

भाजपच्या लोकांनाही राम मंदिरात जे सुरू आहे, ते पटत नाही. त्यांनी पुढची रथयात्रा काढायला हरकत नाही. त्यातही शिवसेना सहभागी व्हायला तयार आहे. जे–जे हिंदूंच्या भावनांशी खेळत आहेत, हिंदुत्वाचा बुरखा घालून राम मंदिर लुटत आहेत, ते देशद्रोह करीत आहेत. याविरोधात देशभर आंदोलन सुरू झाले असून, महाराष्ट्रही मागे राहणार नाही. महाराष्ट्र नेतृत्व करेल. महाराष्ट्र एकदा जागा झाला की संपूर्ण देश जागा होतो. त्यामुळे आधी महाराष्ट्रातून सुरुवात होईल आणि नंतर अयोध्येलाही जाऊ,’ असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

ठाकरे म्हणाले, की जे मंदिर लुटत आहेत, मग ते भाजपचे असोत किंवा आणखी कुणीही असोत, त्यांना हिंदू माफ करणार नाही, अशा शब्दांत ठाकरे यांनी रविवारी

▶▶ पान २ वर

# पावसाचा जोर वाढणार

## राज्यात ४ जिल्ह्यांना रेड अलर्ट, तर ९ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट



पुणे । प्रतिनिधी

कोकण आणि विदर्भात जोरदार पावसाच्या सरी हजेरी लावत असून मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात मात्र पावसाचा जोर कमीच आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, नाशिक घाटमाथा, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक, कोल्हापूर घाटमाथा, अमरावती, भंडारा, गोंदिया,

▶▶ पान २ वर


# १० हजारांच्या लाचेपासून कोट्यवधींच्या संपत्तीचा पर्दाफाश

## अकोल्याच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याच्या घरात घबाड!

जळगाव । प्रतिनिधी

**अकोल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी किरण चौधरी यांच्या निवासस्थानी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत खळबळ उडवली आहे. केवळ १० हजार रुपयांच्या लाच प्रकरणातून सुरू झालेला तपास थेट कोट्यवधींच्या संपत्तीपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे.**

पथकाने जळगाव येथील घरावर छापा टाकून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोने–चांदीचे दागिने तसेच अनेक मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे जप्त केली आहेत. प्राथमिक अंदाजानुसार या सर्व मुद्देमालाची किंमत सुमारे ३ कोटी रुपयांच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे. कारवाईदरम्यान घरात रात्री



उशिरापर्यंत रोख रकमेची मोजदाद सुरू होती. अचानक झालेल्या या छाप्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, अधिकाऱ्यांच्या संपत्तीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. लहान लाच प्रकरणातून सुरू झालेला हा तपास आता मोठ्या आर्थिक अनियमिततेच्या दिशेने जात असल्याचे स्पष्ट होत आहे. कडून पुढील तपास सुरू असून, आणखी मालमत्ता उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

▶▶ पान २ वर

# प्रवेशासाठी जातवैधता प्रमाणपत्रासाठी सहा महिन्याची मुदत–मंत्री चंद्रकांत पाटील




मुंबई । प्रतिनिधी

**सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षातील अभियांत्रिकी, वैद्यकीय तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता सहा महिन्यांची मुदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.**

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच इतर मागास प्रवर्गमधील अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र, काही विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र

▶▶ पान २ वर

# राम मंदिरातील नियमांत मोठा बदल जमिनीवर बसून होणार दान मोजणी



अयोध्या । वृत्तसंस्था

राम मंदिरातील दान मोजणी व्यवस्थेत सुरक्षा आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी एक मोठा बदल करण्यात आला आहे. मोजणी कक्षात आता कर्मचाऱ्यांना कडक सुरक्षा व्यवस्था आणि डबल चेकिंग केल्यानंतरच प्रवेश दिला जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोजणी करणाऱ्या कर्मचा–यांसाठी आता नवा ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांना नो पॉकेट असलेला डार्क ब्लू रंगाचा पोशाख घालणे बंधनकारक असेल. यासोबतच मोजणी कक्षात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक कर्मचाऱ्याला दोन टप्प्यांच्या सुरक्षा तपासणीला सामोरे जावे लागेल. दानाची मोजणी आता खुर्ची–टेबलवर नव्हे,

▶▶ पान २ वर

# मौन सोडा, बेफाम नेत्यांवर कठोर कारवाई करा!

## राज ठाकरेंचे मुख्यमंत्री फडणवीसांना खरमरीत पत्र

मुंबई । प्रतिनिधी

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून एक खुले पत्र लिहित राज्यातील सध्याच्या राजकीय वातावरणावर आणि सत्ताधारी नेत्यांच्या वर्तनावर कठोर शब्दांत टीका केली आहे. सत्तेचा गैरवापर, असंवेदनशील वक्तव्ये आणि चुकीच्या कृत्यांवर कारवाई होत नसल्याने महाराष्ट्राच्या राजकारणाची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.**

राज ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे की, केंद्रातील सत्ताधाऱ्यांमध्ये सत्तेचा



अहंकार वाढल्याची भावना देशभरात निर्माण झाली आहे. मात्र आता त्याच प्रकारचा प्रभाव महाराष्ट्रातही दिसू लागल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचे नेहमीच देशभर कौतुक होत आले, पण गेल्या काही वर्षांत ती परंपरा ढासळत असल्याची टीकाही त्यांनी केली. राज ठाकरे यांनी एका आमदार आणि पक्ष पदाधिकाऱ्याचा थेट उल्लेख न करता, लोकांच्या मृत्यूवर हसल्याचा आरोप करत अशा प्रकारच्या वर्तनावर कठोर कारवाई न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. अशा घटनांनंतरही सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्यामुळे चुकीचा संदेश जात असल्याचे त्यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा सुसंस्कृत आणि संवेदनशील नेत्याची असल्याचे सांगताना, अशा घटनांवर त्यांचे मौन अनेक प्रश्न निर्माण करत असल्याचे राज ठाकरे म्हणाले. सत्ताधारी नेते किंवा मंत्री वादग्रस्त विधाने करत असतानाही त्यांच्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्या ३७ वर्षांच्या राजकीय अनुभवाचा उल्लेख करताना राज ठाकरे यांनी सांगितले की, पूर्वी कोणत्याही

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# २५० वर्षांची अमेरिका : महासत्तेचा प्रवास, लोकशाहीचे धडे आणि भारत

४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्याची घोषणा करून अमेरिकेने ब्रिटिश वसाहतवादाला आव्हान दिले. आज, २५० वर्षांच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अमेरिकेकडे जग एका महासत्तेच्या रूपात पाहते. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, संरक्षण, शिक्षण आणि नवोपक्रम या क्षेत्रांत अमेरिकेने जागतिक नेतृत्व निर्माण केले आहे. परंतु हा प्रवास केवळ यशाचा नाही; तो संघर्ष, अंतर्विरोध, सामाजिक बदल आणि लोकशाहीच्या सततच्या परीक्षांचाही इतिहास आहे. भारताच्या दृष्टीने अमेरिकेच्या या प्रवासाकडे केवळ कौतुकाने नव्हे, तर चिकित्सक नजरेने पाहण्याची गरज आहे. अमेरिकेच्या स्थापनेचा पाया ''स्वातंत्र्य'' आणि ''समान हक्क'' या मूल्यांवर रचला गेला. परंतु स्वातंत्र्याची घोषणा झाल्यानंतरही गुलामगिरी जवळपास शतकभर टिकून राहिली. यादवी युद्ध, गुलामगिरीची समाप्ती, आफ्रिकन-अमेरिकन नागरिकांचे नागरी हक्क आंदोलन आणि महिलांच्या मतदानाच्या अधिकारासाठी झालेला दीर्घ संघर्ष हे दाखवून देतात की लोकशाहीची घोषणा आणि तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी असू शकते.

आजही अमेरिकेत वांशिक असमानता, बंदूक हिंसा, स्थलांतराचा प्रश्न, राजकीय ध्रुवीकरण आणि सामाजिक विषमता यांसारखी आव्हाने कायम आहेत. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असूनही लाखो नागरिकांना आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यामुळे महासत्ता होणे म्हणजे सर्व समस्या संपणे नव्हे, हे अमेरिकेचे वास्तव अधोरेखित करते. तथापि, अमेरिकेची एक मोठी ताकद म्हणजे तिच्या संस्थांची क्षमता. राष्ट्राध्यक्षांपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत, प्रसारमाध्यमांपासून विद्यापीठांपर्यंत आणि संशोधन संस्थांपासून नागरी समाजापर्यंत विविध संस्था सतत सार्वजनिक धोरणांवर प्रश्न उपस्थित करत राहतात. लोकशाहीमध्ये मतभेद हे कमकुवतपणाचे नव्हे, तर संस्थात्मक ताकदीचे लक्षण असू शकतात, हा धडा अमेरिकेच्या अनुभवातून मिळतो. भारतासाठी या प्रवासात अनेक सकारात्मक प्रेरणाही आहेत. उच्च शिक्षण, संशोधन, स्टार्टअप संस्कृती, नवोपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन आणि उद्योजकतेत अमेरिकेने जगासाठी मानके निर्माण केली. भारतीय वंशाच्या लाखो नागरिकांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्था, आरोग्य, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सिलिकॉन व्हॅलीपासून नासापर्यंत भारतीयांची उपस्थिती दोन्ही देशांतील मानवी संसाधनांच्या परस्परपूरक नात्याची साक्ष देते. भारत-अमेरिका संबंधही गेल्या दोन दशकांत लक्षणीय बदलले आहेत. संरक्षण सहकार्य, व्यापार, सेमीकंडक्टर, स्वच्छ ऊर्जा, क्वाडसारखी बहुपक्षीय भागीदारी आणि इंडो-पॅसिफिकमधील धोरणात्मक सहकार्य यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ झाले आहेत. चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका अनेक सामरिक मुद्द्यांवर एकत्र येताना दिसतात. मात्र, भारताने अमेरिकेकडून प्रेरणा घेताना अंधानुकरण टाळणे आवश्यक आहे. अमेरिकेची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय रचना भारतापेक्षा वेगळी आहे. भारताचे लोकसंख्यात्मक वैविध्य, भाषिक विविधता आणि संघराज्य व्यवस्था लक्षात घेता भारतीय विकासाचा मार्ग भारतीय वास्तवाशी सुसंगत असला पाहिजे. कोणत्याही महासत्तेचे मॉडेल जसेच्या तसे स्वीकारणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. याचबरोबर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाकडेही संतुलित नजरेने पाहणे गरजेचे आहे. लोकशाही आणि मानवी हक्कांचा पुरस्कार करताना विविध काळात अमेरिकेने जगातील अनेक संघर्षांमध्ये लष्करी हस्तक्षेप केले. काही हस्तक्षेपांमुळे प्रादेशिक अस्थिरता वाढल्याची टीका आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली आहे. त्यामुळे जागतिक नेतृत्वासोबत जागतिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असते, हा संदेश या इतिहासातून मिळतो. भारतासाठी सर्वात महत्त्वाचा धडा म्हणजे मजबूत संस्था, वैज्ञानिक विचार, शिक्षणातील गुंतवणूक आणि नवोपक्रम यांशिवाय दीर्घकालीन प्रगती शक्य नाही. लोकशाही केवळ निवडणुकांवर उभी राहत नाही; ती उत्तरदायित्व, स्वतंत्र संस्था, मुक्त माध्यमे, न्यायव्यवस्था आणि सक्रिय नागरिक यांवर टिकून राहते. अमेरिकेच्या २५० वर्षांच्या प्रवासाचे मूल्यमापन करताना दोन वास्तव समोर येतात. एक म्हणजे अपूर्व आर्थिक, वैज्ञानिक आणि सामरिक यश; दुसरे म्हणजे त्या यशामागील सततचा आत्मपरीक्षणाचा प्रवास. या दोन्ही पैलूंमधून भारताने शिकण्यासारखे बरेच काही आहे. अखेरीस, अमेरिकेची २५० वर्षांची कहाणी ही केवळ एका राष्ट्राच्या महासत्ता बनण्याची कथा नाही. ती लोकशाहीच्या सतत चालणाऱ्या प्रयोगाची, संस्थांच्या सामर्थ्याची आणि चुका मान्य करून सुधारणा करण्याच्या क्षमतेची कहाणी आहे. भारतासाठी खरा धडा असा की, जागतिक शक्ती होण्याचा मार्ग केवळ आर्थिक वाढीत नाही, तर मजबूत लोकशाही संस्था, सामाजिक समावेशकता, वैज्ञानिक दृष्टी आणि संविधानिक मूल्यांप्रती असलेल्या निष्ठेत दडलेला आहे.

# श्रीसंत मुक्ताबाई पालखी जालन्यात दाखल

जालना । प्रतिनिधी

**वारकरी संप्रदायासाठी अत्यंत आनंदाची व ऐतिहासिक बाब म्हणजे श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर येथील पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला असून, हा वारकरी परंपरेतील एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय क्षण ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून व विविध शासकीय विभागांच्या समन्वयाने हा सोहळा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे.**

श्री संत मुक्ताबाई यांची पालखी दि. ०४ जुलै २०२६ रोजी जालना जिल्ह्यात प्रवेश केला आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कन्हैयानगर, जालना येथे पालखीचा मुक्काम राहणार आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी जिल्हा प्रशासनामार्फत भाविक वारकरी, दिंडी तसेच सेवेकऱ्यांसाठी आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



यामध्ये वॉटरप्रूफ मंडप, अखंडित वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, डास प्रतिबंधक फवारणी, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, अग्निशमन सेवा, पशुवैद्यकीय सुविधा तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संत मुक्ताबाई पालखीच्या जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या ऐतिहासिक रिंगण सोहळ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, विविध विभागांतील एकूण ३२५+ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये २२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी, जालना शहर महानगरपालिकेची स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था व नागरी सुविधांसाठी नियुक्त २ विशेष पथके (एकूण ३८ अधिकारी/कर्मचारी), २ आरोग्य पथके (एकूण ३३ अधिकारी/कर्मचारी), ४ रुग्णवाहिका, २ अग्निशमन वाहने, महावितरणची २ तांत्रिक पथके, २ पशुवैद्यकीय पथके तसेच विविध विभागांची, आरोग्य सेवेस, अखंडित वीजपुरवठ्यास, स्वच्छतेस तसेच इतर सर्व नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण समन्वयाने कार्यरत राहणार आहेत. त्यानंतर दि. ०५ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत जे.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे संत मुक्ताबाई पालखीचा प्रथम ऐतिहासिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, कार्यक्रमस्थळी मंच व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, नियंत्रण कक्ष, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, अग्निशमन पथक, पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रिंगण सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी, पालकमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आयुक्त, शहर महानगरपालिका, निवासी उपजिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल, पोलीस, आरोग्य, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, अग्निशमन, पशुसंवर्धन, जिल्हा परिषद, परिवहन तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. या ऐतिहासिक सोहळ्यास पालकमंत्री पंकजा मुंडे तसेच वारकरी संप्रदायातील संत, महंत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व भाविकांच्या सुरक्षितता, सुविधा व सुयोग्य व्यवस्थापनास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, सर्व संबंधित यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत. भाविकांनी प्रशासनाने केलेल्या वाहतूक नियोजन, पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. संत मुक्ताबाई पालखीचा जालना जिल्ह्यात प्रथमच आयोजित होत असलेला हा ऐतिहासिक रिंगण सोहळा वारकरी परंपरेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल. या भक्तिमय, सांस्कृतिक व ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी जालना जिल्ह्यातील तसेच परिसरातील सर्व वारकरी, भाविक, नागरिक आणि युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अभूतपुर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

## लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त शिवसंग्रामच्या १५ कार्यकर्त्यांचा मरणोत्तर देहदान, अवयवदान व नेत्रदानाचा संकल्प

बीड । प्रतिनिधी

**दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त यंदा शिवसंग्रामच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या विनायकराव मेटे यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी एक प्रेरणादायी निर्णय घेत मरणोत्तर देहदान, अवयवदान आणि नेत्रदानाचा संकल्प केला.**

जयंतीनिमित्त डॉ. ज्योती मेटे यांनी मरणोत्तर देहदान, अवयवदान आणि नेत्रदानाचा संकल्प जाहीर केला होता. त्यांच्या या समाजाभिमुख निर्णयातून प्रेरणा घेत शिवसंग्रामच्या १५ कार्यकर्त्यांनीही मरणोत्तर देहदान, अवयवदान आणि नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, समाजात अवयवदान आणि देहदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. मरणोत्तर देहदान, अवयवदान आणि नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्यांमध्ये दोडके फौजी, ॲड. मनीषा कूपकर, बाळासाहेब हावळे, कुंदन गायकवाड, सुनील कुटे, संध्या लांगोरे, स्वाती शिंदे, संगीता ठोसर, शामसुंदर शिंदे, बागडे मॅडम, डॉ. राजेंद्र बंड, डॉ. सविता बंड, दिगंबर भोसले, लिंबराज वाघ आणि हनुमंत पवार यांचा समावेश आहे. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आयुष्यभर समाजसेवा, शिक्षण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा वारसा कृतीतून जपण्याचा निर्धार शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी केला असून, हा संकल्प समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# आरटीओच्या नावावर वाहनधारकांची फसवणूक?

## लाखो रुपयांच्या अवैध वसुलीचा संशय; चौकशी सुरू

जालना । प्रतिनिधी

**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना कार्यालयाच्या निदर्शनास एक गंभीर बाब आली आहे. युसुफ खान सिकंदर खान व्यक्ती गेल्या अनेक दिवसांपासून स्वतःला आरटीओ कार्यालयाशी संबंधित असल्याचे भासवून वाहनधारकांची दिशाभूल करत असून, वाहनांचे हप्ते व इतर शुल्काच्या नावाखाली लाखो रुपयांची अवैध वसुली करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.**

सदर व्यक्तीशी संपर्क साधण्यासाठी कार्यालयाकडून वारंवार दूरध्वनी तसेच मोबाईल कॉलद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र संबंधित व्यक्तीने कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच त्याला याबाबत खुलासा करण्यासाठी आरटीओ कार्यालयात उपस्थित राहण्याचे सांगण्यात आले असतानाही त्याने हजर राहणे किंवा कोणतीही माहिती देणे टाळले. दरम्यान, नियमित तपासणीदरम्यान काही वाहनांवर नियमभंगाबाबत मेमो देण्यात आले. त्यावेळी संबंधित वाहनधारकांनी, ''आम्ही आमच्या वाहनांचे हप्ते नियमितपणे युसुफ खान सिकंदर खान व्यक्तीकडे भरत आहोत. मग आमच्या वाहनावर कारवाई का करण्यात आली?'' असा प्रश्न उपस्थित केला. या घटनेनंतर संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. चौकशीदरम्यान अनेक वाहनधारकांनी संबंधित व्यक्ती बराच काळ आरटीओ कार्यालयाच्या नावाचा गैरवापर करून अवैधरित्या पैसे गोळा करत असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली असून, संबंधित व्यक्तीविरुद्ध आवश्यक पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. आर टी ओ च्या नावाने पैसे घेत असल्याचा पुरावा एका वाहन चालकाकडून दिनांक ३/७/२०२६ रोजी मिळाला. त्या मुळे युसुफ खान सिकंदर खान या व्यक्तीने दिनांक ०३/०७/२०२६ रोजी जालना आर टी ओ च्या वायुवेग पथकाच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे संबंधित व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता ( बी एन एस ) २०२३ अन्वये १३२, १२१(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा नोंद केल्याचा राग मनात धरून त्याने अधिकाऱ्यांना सोशल मीडिया वर व पत्रकार परिषद घेऊन खोटी बदनामी करण्याची धमकी दिली. आरटीओ कार्यालय सर्व वाहनधारकांना आवाहन करत आहे की, कोणत्याही व्यक्तीकडे रोख स्वरूपात किंवा अनधिकृत पद्धतीने पैसे जमा करू नयेत. शासनमान्य प्रक्रिया व अधिकृत पावतीशिवाय कोणतेही शुल्क भरू नये. अशा प्रकारची फसवणूक किंवा संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ आरटीओ कार्यालयाशी संपर्क साधून माहिती द्यावी.

## श्री हॉस्पिटल या ठिकाणी रक्तदान व महाआरोग्य तपासणी शिबिर

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील चंद्रभागा मल्टीस्टेट चे अध्यक्ष अतुल ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी रक्तदान व महारोग्य तपासणी शिबिराचे आयोजन श्री हॉस्पिटलमध्ये करण्यात आले. या शिबिरात ७३ रक्तदात्यांनी रक्तदान तर १५५ गरजवंत रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.**



दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भोसले साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.अमोल लगड, भौतिकोपचार तज्ज्ञ डॉ.संतोष गायकवाड, दंतरोग तज्ज्ञ डॉ.कृष्णा फड, माजी पंचायत समिती सदस्य कैलास ठोंबरे तसेच अतुल ठोंबरे, डॉ.विष्णु तांबडे व डॉ.दत्तात्रय भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती होती. वाढदिवसानिमित्त अवांतर खर्च करण्यापेक्षा सामाजिक उपक्रम राबवून समाज उपयोगी कार्य केल्याबद्दल सपोनि महेश भोसले यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. या शिबिरामध्ये ७३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, तर १५५ गरजवंत रुग्णांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन डॉ. शुभम तिडके, कैलास साळुंखे आणि अशोक लगड यांनी केले होते.

## पान १ वरून...

### कापूस क्षेत्र वाढले; पण अधिकृत

अधिकृत विक्रीतील घट आणि प्रत्यक्ष लागवडीतील वाढ यामधील विसंगतीमुळे एचटीबीटी बियाण्यांचा वापर वाढल्याचा संशय अधिक बळावत आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने जिल्ह्यातील बियाणे पुरवठा साखळी आणि विक्री व्यवस्थेची सखोल तपासणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. एचटीबीटी बियाण्यांकडे काही शेतकरी आकर्षित होण्यामागे तणनाशक सहन करण्याची क्षमता हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जाते. या बियाण्यांमुळे तण नियंत्रणासाठी मजुरांवरील अवलंबित्व कमी होते आणि निंदणीचा खर्च वाचतो, अशी धारणा अनेक शेतकऱ्यांमध्ये आहे. वाढती मजूर टंचाई, मजुरीचे वाढते दर आणि शेतीचा वाढलेला उत्पादन खर्च यामुळे काही शेतकरी जोखीम पत्करूनही अशा बियाण्यांची निवड करत असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, अधिकृत कृषी सेवा केंद्रांनी हंगाम लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात प्रमाणित कापूस बियाण्यांचा साठा करून ठेवला आहे. मात्र अपेक्षित विक्री न झाल्याने अनेक विक्रेते आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणात भांडवल अडकून पडल्यामुळे परवानाधारक विक्रेत्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून अनधिकृत विक्रीमुळे अधिकृत व्यवसायावर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. कृषी विभागासाठीही ही परिस्थिती चिंतेची ठरत आहे. प्रतिबंधित बियाण्यांची विक्री होत असल्यास ती रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम, भरारी पथके आणि विक्री साखळीवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे मत कृषी क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. बियाण्यांच्या अनधिकृत पुरवठ्यामागील नेटवर्क उघडकीस आणून दोषींवर कठोर कारवाई केल्याशिवाय हा प्रकार थांबणे कठीण असल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना केवळ शासनमान्य, प्रमाणित आणि अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाण्यांची खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. अनधिकृत बियाण्यांची गुणवत्ता, उत्पादन क्षमता आणि कायदेशीर जबाबदारी याबाबत कोणतीही हमी नसल्याने अशा बियाण्यांचा वापर भविष्यात मोठे आर्थिक नुकसान ठरू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला आहे. कृषी विभाग या प्रकरणाकडे किती गांभीर्याने पाहतो आणि अनधिकृत बियाण्यांच्या विक्रीवर किती प्रभावी कारवाई करतो, याकडे शेतकरी, विक्रेते आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.माहितीनुसार, काही भागांत गावांतील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत एचटीबीटी बियाणे पोहोचविण्याचे जाळे कार्यरत असल्याची चर्चा आहे. बियाण्यांच्या विक्रीवर आकर्षक कमिशन, अधिक विक्री करणाऱ्यांना दुचाकी, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा रोख प्रोत्साहन देण्याचे आमिष दाखवून अनधिकृत विक्री वाढवली जात असल्याचे आरोप केले जात आहेत. या व्यवहारात मध्यस्थांची साखळी तयार झाल्याने प्रशासनाला कारवाई करणे अधिक कठीण होत असल्याचेही बोलले जात आहे.

-------------

### राम मंदिराचा पैसा खासदार

(दि.५) दादरच्या मारुती मंदिर येथे रामरक्षा आंदोलन आणि महाआरती करणार असल्याची घोषणा केली. ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी शिवसेना नेते, खासदार संजय राऊत आणि खासदार अनिल देसाई उपस्थित होते. ''आता हिंदू जागा झाला असून राम मंदिरातील लुटीचा जाब विचारण्यासाठी रामरक्षा, मारुती स्तोत्र आणि हनुमान चालिसा म्हणत यांना जाब विचारणार आहोत,'' असेही ते म्हणाले. दादर येथील मारुती मंदिरासमोर होणाऱ्या आंदोलनात जे हिंदू आहेत, ज्यांना रामाच्या मंदिरात होत असलेली चोरी सहन होत नाही आणि ज्यांना याबाबत जाब विचारावा वाटतो, त्या सर्वांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन ठाकरे यांनी केले. राम मंदिराचे आंदोलन सुरू होण्यापूर्वी संपूर्ण देशात भाजपचे फक्त दोनच खासदार होते. गांधीवादी समाजवाद हा भाजपने अंगीकारलेला कार्यक्रम होता. तो कार्यक्रम सोडून ते हिंदुत्वाकडे वळले. राम मंदिराच्या मुद्द्याला हात घातला आणि आज देशात अमर्याद सत्ता भोगत आहेत. भाजपच्या काळात राम मंदिर हा मुद्दा आज वेगळ्याच गोष्टीसाठी चर्चिला जात आहे, हे दुर्दैव आहे. भाजपकडून दरोडेखोरी चालली आहे, राजकीय पक्ष फोडले जात आहेत, आमदार-खासदार चोरले जात आहेत, खरेदी-विक्री होत आहे आणि त्याला 'ऑपरेशन' असे नाव दिले जाते. मग भाजप 'ऑपरेशन राम मंदिर' करत आहे का, असा सवालही त्यांनी केला.

-------------

### इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे

मिश्रणाचे पेट्रोल बाजारात येईल असा नाही, तर सर्व आवश्यक चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच पुढील पाऊल उचलले जाईल, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल मिश्रण करण्याचा निर्णय सर्व आवश्यक आणि कठोर तांत्रिक चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

------------

### प्रवेशासाठी जातवैधता प्रमाणपत्रासाठी

मिळविण्यात तांत्रिक व प्रशासकीय अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना अर्जाच्या दिनांकापासून जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. या कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहणार आहे. निर्धारित सहा महिन्यांच्या मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील. तसेच, विद्यार्थ्यांना देण्यात आलेली ही सहा महिन्यांची मुदत अंतिम संधी असून यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

-----------

### पावसाचा जोर वाढणार

नागपूर जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सांगली जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वाशिम, यवतमाळ तुरळक ठिकाणी विजा आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर उर्वरित राज्यात हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. उद्या म्हणजेच रविवारी पालघर, ठाणे, मुंबई, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, रत्नागिरी, नाशिक घाटमाथा, कोल्हापूर घाटमाथा, अमरावती, भंडारा, गोंदिया, नागपूर, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांत कांही ठिकाणी विजांसह पावसाचा ऑरेंज अलर्ट वर्तवला आहे. तर सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

----------

### मौन सोडा, बेफाम नेत्यांवर

पक्षाचा नेता चूक करत असेल, तर त्याला पक्षीय पाठबळ न देता त्याची चूक मान्य केली जात असे. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, प्रमोद महाजन यांसारख्या नेत्यांच्या काळात राजकीय शिस्त आणि जबाबदारीची जाणीव होती, असेही त्यांनी पत्रात लिहिले आहे. आज मात्र ''आपला माणूस'' म्हणून चुकीच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याची टीका करत त्यांनी यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात चुकीचे पायंडे पडत असल्याची चिंता व्यक्त केली. पत्राच्या शेवटी राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना थेट आवाहन केले आहे की, असंवेदनशील आणि बेफाम वर्तन करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर कठोर कारवाई करून आवश्यक असल्यास त्यांचे राजीनामे घ्यावेत. तसेच, ''फडणवीस चुकीचे वर्तन सहन करत नाहीत'' हा संदेश स्पष्टपणे दिल्यास संपूर्ण राजकीय व्यवस्थेत शिस्त निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ''तुम्ही सुज्ञ आहात, त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी योग्य निर्णय घ्याल, अशी अपेक्षा आहे,'' अशा शब्दांत राज ठाकरे यांनी आपल्या पत्राचा शेवट केला.

-----------

### राम मंदिरातील नियमांत मोठा बदल

तर जमिनीवर बसून केली जाईल. मोबाईल, कॅमेरा, बॅग आणि इतर वैयक्तिक सामान मोजणी कक्षाच्या आत घेऊन जाण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना मोजणी कक्षात प्रवेश करण्यापूर्वी आपल्या चपला बाहेरच काढाव्या लागतील. याच दरम्यान राम मंदिरातील दान चोरीचे प्रकरण सातत्याने नवीन खुलाशांमुळे चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपी अनुकल्प मिश्रा याच्याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनुकल्प मिश्राच्या नावावर मंदिरात 'व्यवस्था कार्यकर्ता' म्हणून एन्ट्री पास जारी केला जात असे. मंदिरात होणाऱ्या प्रत्येक विशेष कार्यक्रमादरम्यान अनुकल्प मिश्राच्या नावाने एन्ट्री पास तयार केला जात होता, असा आरोप आहे. याच 'व्यवस्था कार्यकर्ता' पासच्या माध्यमातून त्याला मंदिर परिसरात प्रवेश मिळत असल्याचा दावा केला जात आहे. दुसरीकडे, दान चोरीच्या प्रकरणात श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सदस्य महंत दिनेंद्र दास महाराज यांनी दोषींसाठी कठोर शिक्षेची मागणी केली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ०५ जुलै २०२६


## थोडक्यात

### शिक्षक भरतीच्या जाहिरातींसाठी १५ जुलै पर्यंत तिसऱ्यांदा मुदत वाढ

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक भरती अंतर्गत शाळा व्यवस्थापनांना पवित्र संकेतस्थळावर रिक्त पदांच्या जाहिराती नोंदविण्यासाठी शिक्षण विभागाने पुन्हा तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. नवीन निर्णयानुसार व्यवस्थापनांना आता १५ जुलै २०२६ पर्यंत जाहिरातींची नोंदणी करता येईल. ही तिसरी मुदतवाढ असल्याने शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांची प्रतिक्षा आणखी वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरतीची ही प्रक्रिया मे २०२५ मध्ये सुरू करण्यात आली होती. सुरुवातीला जाहिरात नोंदणीसाठी ३१ मे ही अंतिम मुदत होती. त्यानंतर ती वाढून अनुक्रमे १५ जून आणि ३० जून करण्यात आली. आता ही मुदत १५ जुलै २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या वारंवार मिळणाऱ्या मुदतवाढीतून प्रत्यक्षात किती पदे उपलब्ध होणार, असा प्रश्न उमेदवारांकडून उपस्थित केला जात आहे. शिक्षण विभागाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनांना शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे संकेतस्थळावर त्वरित नोंदवण्याची आवाहन केले आहे. शाळा व्यवस्थापनांनी या प्रक्रियेसाठी https ://tait 2025.mahateacherrecruitment.org.in ) या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे तरी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर १५ जुलै २०२६ पर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

### बीड शहरात जिजाऊ स्मृती रथयात्रेचे भव्य स्वागत

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊमासाहेब यांच्या स्मृतीला अभिवादन करणारी 'जिजाऊ स्मृती रथयात्रा' रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता बीड शहरात दाखल होणार आहे. या यात्रेचे आगमन तीर्थक्षेत्र सिंदखेडराजा येथून सुरू झाले असून, आंतरावली सराटी येथून बीड शहरात प्रवेश करेल. यात्रेच्या स्वागतासाठी मुक्ताई चौक, बार्शी रोड येथे जिजाऊ प्रेमी व संपूर्ण शिवप्रेमी समाजाच्या वतीने जिजाऊ स्मृती रथाचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे भव्य कार्यक्रम व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.




या जिजाऊ स्मृती रथयात्रेचे आयोजन लखुजी राजे जाधव यांचे वंशज श्री भागवतराव मानसिंगराव जाधवराव राजे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले आहे. यात्रेचा समारोप जिजाऊ मासाहेब यांच्या समाधीस्थळी, पाचाड किल्ल्याच्या पायथ्याशी (रायगड) पूजन व मानवंदना देऊन होणार आहे. आयोजकांनी शहरातील सर्व शिवप्रेमी, जिजाऊ प्रेमी नागरिकांना हाक दिली आहे की, रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी आशीर्वाद मंगल कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित राहून जिजाऊ मातेच्या स्मृतीला आदरांजली वाहावी.

**आयोजकांचे आवाहन**

श्री भागवतराव मानसिंगराव जाधवराव, बीड येथील प्रगतिशील शेतकरी श्री मदनराव पिंगळे व आशीर्वाद मंगल कार्यालयाचे ह.भ.प. श्री हरिदास भाऊ जोगदंड यांनी सर्व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. ही यात्रा केवळ एक धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम नसून, मराठा समाजात जिजाऊ मातेच्या प्रेरणादायी जीवनाचा वारसा जागृत करण्याचा एक भावपूर्ण उपक्रम आहे. बीडकरांनी एकत्र येऊन या रथयात्रेला भव्य स्वागत करावे, अशी अपेक्षा सर्व जिजाऊ भक्त व्यक्त करत आहेत.

## वार्षिक मालमत्ता कर आकारणीबाबत नागरिकांना दिलासा

### कोणावरही अन्याय होणार नाही-नगराध्यक्षा वंदनाताई जगताप

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायतीकडून सुरू असलेल्या चतुर्थ वार्षिक मालमत्ता कर आकारणीच्या सर्वेक्षणाबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमावर नगराध्यक्षा सौ. वंदनाताई जगताप यांनी स्पष्टीकरण देत, कर आकारणीमध्ये कोणावरही अन्याय होणार नाही. सर्व त्रुटी दूर केल्यानंतरच अंतिम कर आकारणी लागू करण्यात येईल, अशी ग्वाही दिली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियमाच्या कलम ११९(१) अंतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी सर्वेक्षण करून नागरिकांना प्राथमिक नोटिसा देण्यात आल्या आहेत. या नोटिसांमधील त्रुटी, आक्षेप किंवा चुका दुरुस्त केल्यानंतरच अंतिम कर निश्चित केला जाणार असल्याने नागरिकांनी अफवा किंवा गैरसमजांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले.

नगराध्यक्षा जगताप म्हणाल्या की, २०१५ मध्ये ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर झाल्यानंतर दर चार वर्षांनी कर आकारणीचे सर्वेक्षण होणे आवश्यक होते. मात्र, अनेक वर्षे २००२ च्या ग्रामपंचायतकालीन नोंदींच्याच आधारे कर आकारणी होत राहिली. त्यामुळे २००२ ते २०२६ या कालावधीत झालेल्या अनेक नवीन निवासी व व्यावसायिक बांधकामांचा करामध्ये समावेश झाला नव्हता. परिणामी नगरपंचायतीच्या उत्पन्नावर परिणाम होऊन स्वच्छता, पाणीपुरवठा, वीजबिल, कर्मचारी वेतन आणि इतर



मूलभूत सेवांवर आर्थिक ताण निर्माण झाला.

सर्वेक्षण करणाऱ्या कंपनीकडून अनेक ठिकाणी चुका झाल्याचे मान्य करत त्यांनी सांगितले की, ही अंतिम कर आकारणी नसून नागरिकांच्या तक्रारींवर ७ जुलै रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा केली जाणार आहे. सर्व नगरसेवकांशी विचारविनिमय करून योग्य निर्णय घेतला जाईल. त्रुटी असलेल्या मालमत्तांचा फेरसर्वे करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल. अंतिम कर निश्चित होईपर्यंत नवीन कराची वसुली केली जाणार नाही.

योग्य व न्याय्य कर आकारणीमुळे नगरपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होऊन शहरात स्वच्छता, नियमित पाणीपुरवठा, दर्जेदार मूलभूत सुविधा आणि विकासकामे अधिक प्रभावीपणे राबविता येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नगराध्यक्षा जगताप यांनी स्पष्ट केले की, मालमत्ता कर आकारणी हा कायद्याने बंधनकारक विषय असून त्याचे राजकारण करू नये. कोणत्याही पक्षाची सत्ता असली तरी नियमानुसार कर आकारणी करणे आवश्यकच आहे. आम्ही निवडणुका डोळ्यासमोर ठेवून गोड बोलण्यापेक्षा कायद्याप्रमाणे जबाबदारीने काम करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. शेवटी त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला बळी न पडता वस्तुस्थिती समजून घ्यावी व शहराच्या विकासासाठी नगरपंचायतीला सहकार्य करावे. आपली नगरपंचायत - आपल्या सेवेसाठी या भावनेतूनच पारदर्शक आणि न्याय्य कर आकारणीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे, असे त्या म्हणाल्या.

## जिल्ह्यातील अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळा बंद

### हजारो शिक्षक मुंबई आंदोलनात सहभागी होणार!

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक समन्वय संघाच्या राज्यव्यापी आंदोलनाला पाठिंबा देत ७ व ८ जुलै रोजी बीड जिल्ह्यातील सर्व अंशतः अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा बंद ठेवण्यात येणार आहेत. याबाबत बीड जिल्हा शिक्षक समन्वय संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांना निवेदन देण्यात आले. तसेच यावेळी जिल्ह्यातील हजारो शिक्षक मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी होणार असल्याचे ही कळविण्यात आले.




राज्यातील अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २२ जूनपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. मात्र, शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शिक्षक समन्वय संघाने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ७ व ८ जुलै रोजी राज्यभरातील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. या बंद मध्ये राज्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाचालक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी सहभागी होऊन शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांना बळ द्यावे, असे आवाहन खंडेराव जगदाळे यांनी केले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व अंशतः अनुदानित विनाअनुदानित शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी दोन दिवस ७ व ८ जुलै रोजी शाळा बंद ठेवून आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. यानुसार जिल्हा समन्वय संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया राणी पाटील मॅडम यांना निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, तुकाराम शिंदे, प्रताप पवार, श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, आत्माराम वाव्हळ, अरविंद सौंदलकर, श्रीमती माने मॅडम, श्रीमती कांडेकर मॅडम, शेख, अशोक मोरे, महादेव शेंडगे, सुतार, भागवत यादव आदी पदाधिकारी व शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या असून, जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिक्षक मुंबईतील आंदोलनात सहभागी होणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## पान ६ वरुन...

### अंमली पदार्थांविरुद्ध मोठी

आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिटके आणि अंबाजोगाईचे सहा. पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड, सुशांत सुतळे, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप, गोविंद भताने, गोविंद राखे, विकास राठोड, सचिन आंधळे, बबन सलगरे, विकी सुरवसे, अतुल हराळे, सुनिल राठोड आणि परळी ग्रामीण पोलीस ठाण्यातील मल्हार शिवरकर, निमोने, पुजरवाड, वाले, केदार व पोकळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

### नागपूरला पळवून नेलेल्या

पो. नि. शीतलकुमार बल्लाळ, सपोनि प्रल्हाद मुंडे, पोउपनि ज्ञानेश्वर धोत्रे, सहा. पो. उपनिरीक्षक संतोष राऊत आणि पोलीस अंमलदार अशोक शिंदे यांनी केली. विशेषतः अशोक शिंदे आणि संतोष राऊत यांनी तांत्रिक तपास व चिकाटीच्या जोरावर ही शोधमोहीम यशस्वी केली.

पालकांना आवाहन:

शिवाजीनगर पोलिसांनी पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या पाल्यांच्या हालचाली, मित्रपरिवार तसेच मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वापरावर वेळोवेळी लक्ष ठेवावे. कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### महापुरुषांचा अवमान करणाऱ्यावर

यावेळी आझाद क्रांती सेना तालुका अध्यक्ष संदीप बनसी वाल्हेकर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर करून दोषींवर त्वरित कारवाई न झाल्यास तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.महापुरुषांचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. समाजात द्वेष पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करावा, अशी संतप्त भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### अवैध वाळू वाहतूक करणारा

पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र ओव्हाळ करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किशोर पवार, कल्याण राठोड, गोरक्ष डोके आणि जितेंद्र ओव्हाळ यांनी सहभाग घेतला.

### पोलिसांकडून ६६ गुन्ह्यांतील

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग न्यायालय, गेवराई यांच्याकडून प्राप्त आदेशानुसार, राज्य उत्पादन शुल्क बीड कार्यालयाचे दुय्यम निरीक्षक राहुल वानवळे आणि दोन पंचांच्या उपस्थितीत हा सर्व मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यासह सफौ भिसे, पोह कल्याण राठोड, मुद्देमाल कारकून पोह रघुनाथ शेवरे, पोकॉ महेश भागवत आणि कोर्ट पैरवी पोह विठ्ठल म्हेत्रे यांनी विशेष कामगिरी बजावली. गेवराई पोलीस प्रशासनाच्या या कारवाईमुळे पोलीस ठाण्यातील प्रलंबित मुद्देमालाचा प्रश्न निकाली निघाला आहे

### अटल अमृत पाणीपुरवठा

सामोरे जावे लागत आहे. या प्रकरणी माहितीच्या अधिकार (आरटीआय) अंतर्गत माहिती मागवूनही प्रशासनाने समाधानकारक प्रतिसाद न दिल्याने सय्यद सादेक यांनी न्यायालयाचे दार ठोठावले.

उच्च न्यायालयाने संबंधित अधिकारी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला नोटिसा बजावत २८ जुलै २०२६ पर्यंत न्यायालयात आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. ही याचिका छत्रपती संभाजीनगर येथील ड. पंकज कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल करण्यात आली असून, बीड येथील ड. प्रवीण नेहरकर आणि ड. शिवाजी सपकाळ यांनीही या प्रकरणात कायदेशीर कामकाज पाहिले.

### वन महोत्सवानिमित्त सामाजिक

कालावधीत सामाजिक वनीकरण कार्यालयाशी संपर्क साधून सवलतीच्या दरात रोपे घ्यावीत असेही सांगण्यात आले.

वन महोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक वृक्षलागवड करण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी उपस्थितांनी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, पत्रकार तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वनक्षेत्रपाल श्री.एस.यु. सानप, वनरक्षक श्रीमती डी. एस. वाघमारे, वनरक्षक श्रीमती यू. टी. आरगडे तसेच कार्यालयीन लिपिक श्री. बापू शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नाथापूर ग्रामपंचायततर्फे सरपंच मयुरी चव्हाण यांचा भव्य सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील प्रगतिशील व विकसीत ग्रामपंचायत नाथापूर च्या सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांना लोकप्रिय दैनिक लोकमतच्या वतीने महाराष्ट्राचे महासरपंच हा पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामपंचायतच्या वतीने त्यांचा मंगळवारी भव्य सत्कार करण्यात आला.



नाथापूर ग्रामपंचायत अंतर्गत सरपंच मयुरीताई सुंदर चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात विविध विकासाची कामे करून गावाचा कायापालट केला. गावाला पायाभूत सुविधांची उभारणी करून गाव स्वच्छ,सुंदर बनवले. या सर्व कामाची दखल घेऊन दैनिक लोकमतच्या वतीने बीड येथे भव्य दिव्य असा कार्यक्रम घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते महाराष्ट्राचे महासरपंच हा किताब त्यांना प्रदान केला. पुरस्कार मिळाल्याबद्दल नाथापूर ग्रामपंचायतच्या सचिवालयात मंगळवारी सकाळी सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित ग्रामपंचायतचे पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी मयुरीताई चव्हाण यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना शाल, फेटा, पुष्पहार देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील उपसरपंच सतिष शिंदे, अंकुश चव्हाण,कल्याण शेजुळ, दिलीप काळे,शेख चांद, बळीराम शिंदे ,कानडे सर,उत्तम गिलबिले ,रामनाथ गिराम ,शेख खुदबूदिन,नामदेव चव्हाण,अशोक कापसे,बंडू प्रधान,प्रकाश गिराम, मनोज लुचारे,अशोक गिराम,जिवन पवार, शेख करीम,महादेव शिंदे,अनिल कापसे,नितीन शिंदे,महादेव गिराम,चंद्रकांत रडे, वसंत गिलबिले, वसंत शिंदे,सारडा सर,गणेश सारडा, कुलकर्णी सर,मुंडे सिस्टर, डॉ.पाठक,धुमाळ सर, भानुदास काळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यातील मतदारांनी गणना प्रपत्र अचूक भरून दाखल करावे – बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक ४ ७ २०२६ भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघासह राज्यभरात मतदार यादी विशेष सखोल निरीक्षण कार्यक्रम २०२६ सुरू आहे या महत्त्वाच्या मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांना गणना प्रपत्र वितरित करणार आहेत मतदारांनी हे प्रपत्र अचूक भरून संबंधित बीएलओ कडे सादर न केल्यास त्यांचे नाव आगामी प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही त्यामुळे बीड जिल्ह्यातील मतदारांनी हे प्रपत्र बी एल ओ कडे अचूक सादर करावे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आंधळे यांनी केले आहे पत्रकात पुढे म्हटले आहे की कुटुंबातील कोणतीही एक सज्ञान व्यक्ती स्वतःच्या तसेच कुटुंबातील इतर सदस्याच्या वतीने हे प्रपत्र भरून त्यावर स्वाक्षरी करू शकते प्रत्येक मतदाराचे प्रपत्रामध्ये लावण्यासाठी स्वतःचा एक एक पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो तयार ठेवणे आवश्यक आहे ज्या मतदाराचे गणना प्रपत्र प्राप्त होणार नाही किंवा भरलेले प्रपत्र वेळेत सादर केले जाणार नाही अशा मतदानाची नावे ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीतून थेट वगळण्यात येणार आहेत ज्या मतदारांची २०२२ च्या मतदार यादीशी अद्याप जुळवणी झालेली नाही त्यांनी आपल्या कुटुंबातील सज्ञान सदस्यांची किंवा आई-वडील आजी अथवा आजोबा यांची आवश्यक माहिती संबंधित बी एल ओ कडे उपलब्ध



करून द्यावी योग्य मॅपिंग झाल्यास पुढील जुळवणीची नोटीस मिळण्याची अडचण टाळता येईल सदर माहिती अद्यावत करण्यासाठी व त्रुटी दूर करण्यासाठी मतदारांनी वयोगटानुसार खालील विही त पुरावे सादर करणे बंधनकारक आहे स्वतःचा जन्म दिनांक किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारा कोणताही एक विहित पुरावा स्वतःचा तसेच आई किंवा वडील यापैकी एकाचा विहित पुरावा आई आणि वडील या दोघांचाही विविध पुरावा जन्म प्रमाणपत्र पासपोर्ट शाळा सोडल्याचा दाखला रहिवासी प्रमाणपत्र किंवा शासन /बँक /टपाल विभागाने जारी केलेली अधिकृत ओळखपत्रे ३० जून ते २९ जुलै २०२६ प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी ०५ ऑगस्ट २०२६ ०५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी ६ ऑक्टोबर २०२६ तरी बीड जिल्ह्यातील मतदारांनी या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा व सहकार्य करावे आणि आपली लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी या विशेष मोहिमेत वेळेत सहभाग नोंदवावा असे आव्हान ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक बबनराव आंधळे यांनी केले आहे.

## छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या मातोश्री राजमाता कल्पनाराजे भोसले गोपीनाथ गडावर

### लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे घेतले दर्शन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या मातोश्री राजमाता कल्पनाराजे भोसले यांनी आज गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे हया दिल्लीत असल्याने त्यांनी मोबाईलवरून त्यांच्याशी संवाद साधला.

राजमाता कल्पनाराजे भोसले हया आज जिल्हयात खासगी दौऱ्यावर आल्या होत्या. दुपारी त्यांनी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले. ना.पंकजाताईंनी साधला फोनवरून संवाद

ना. पंकजाताई मुंडे हया नवी दिल्लीत असल्याने त्यांनी राजमाता कल्पनाराजे यांच्याशी मोबाईलवर संवाद साधला. मुंडे साहेबांनी



उदयनराजेंवर पुत्रवत प्रेम केले होते असा उल्लेख त्यांनी यावेळी बोलताना आवर्जून केला. छत्रपती भोसले घराणे आणि मुंडे परिवाराचे प्रेम हे सद्गदित करणारं आहे, असं ना. पंकजाताईंनी यावेळी म्हटले. यावेळी गोपीनाथ गडावर भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेश गीते, वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेश कराड, लक्ष्मीकांत कराड माणिक कराड, जिल्हा सरचिटणीस गणेश कराड, अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष संतोष भगत, शिवाजी गिते, हिंदूलाल काकडे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## नवनियुक्त गटविकास अधिकाऱ्यांची नफरवाडी शाळेला भेट

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी शाळेस पाटोदा तालुक्याचे नवनियुक्त गटविकास अधिकारी माने यांनी भेट दिली.

भेटीदरम्यान त्यांनी शाळेतील एकंदरीत भौतिक सुविधांची पाहणी तर केलीच परंतु जास्त महत्त्वाचे म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली.त्या वेळी एक अधिकारी नाही तर त्यांच्यातील शिक्षकच विद्यार्थ्यांशी चर्चा करत आहेत असे जाणवले.पंडित जवाहरलाल नेहरू,ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारख्या महान व्यक्ती मोठ्या पदावर विराजमान असून देखील विद्यार्थ्यांमध्ये का रमत होते याची प्रचिती गटविकास अधिकारी व विद्यार्थ्यांच्या संवादातून प्रत्यक्ष




आली.शिक्षणाची प्रचंड तळमळ व ऊर्जा असणारे,नाविन्याचा ध्यास घेतलेले,वेगवेगळ्या विषयांचा सखोल अभ्यास असणारे अधिकारी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना अनुभवयास मिळाले. माने यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा या विषयावर अनमोल मार्गदर्शन केले.

शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रम भोंगा शाळा उपक्रम-दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत मोबाईल टि.व्ही बंद करून सर्व विद्यार्थी आपापल्या घरी अभ्यास करतात, सुंदर हस्ताक्षर उपक्रम,सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षांची तयारी उपक्रम,स्वच्छ शाळा सुंदर शाळा उपक्रम,माजी विद्यार्थी संघ कामकाज आणि लोकसहभागातून शाळा विकास पाहून मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदाचे कौतुक केले.

# खरीप पीकविम्यापोटी १६२४ कोटींचे वितरण

दिल्ली / वृत्तसंस्था

पंतप्रधान पीकविमा योजनेच्या खरीप २०२५ मधील हंगामात झालेल्या नुकसानीपोटी राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १६२४ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे सर्वाधिक भरपाई नांदेड जिल्ह्याला मिळाली आहे.

गेल्या खरिपात पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाली होती. त्यामुळे भरपाईकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागून होते. खरीप २०२५ मध्ये राज्यात केवळ दोन विमा कंपन्यांना कंत्राट मिळाले. त्यात आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी होती. या खासगी कंपनीने केवळ धाराशिव, लातूर व बीडमध्ये काम केले. मात्र केवळ लातूरचे १९.७६ कोटींचे विमा दावे मंजूर केले. यातील १९.६६ कोटी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. उर्वरित १०.३९ लाखाची रक्कम जमा करण्याचे काम चालू आहे. केंद्र शासनाच्या कृषी विमा कंपनीने (एआयसी) मात्र गेल्या खरिपात




उल्लेखनीय कामगिरी बजावली. एआयसीने राज्यातील ९ समूहांमधील शेतकऱ्यांचा १६०३ कोटींची विमा भरपाई मंजूर केली. यातून आतापर्यंत १५०४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले आहेत. आणखी ९९.१४ कोटी रुपये जमा करण्याची कामे वेगाने पुढे नेली जात आहेत.

### विमाहप्त्यापोटी जमा केले २४०७ कोटी

विमा कंपन्यांनी गेल्या खरिपात पीकविम्याच्या हप्त्यापोटी २४०७ कोटी रुपये गोळा केले होते. यातील ५४१ कोटी रुपये शेतकरी हिस्सा होता. तसेच विमा अनुदानापोटी केंद्र व राज्याकडून प्रत्येकी ९३३ कोटी रुपयांचा निधी या विमा कंपन्यांना मिळाला. राज्यात १७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना गेल्या खरिपाची पीकविमा भरपाई मंजूर झालेली आहे. त्यातील ९४ टक्के शेतकऱ्यांना भरपाईचे वाटप झाले आहे. उर्वरित दाव्यांची रक्कम जमा करण्याची कामे वेगाने चालू आहेत.

कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या खरिपात १७.१७ लाख शेतकऱ्यांनी पीकविमा काढला होता. एकूण १६२३ कोटींचे विमा दावे मंजूर केले गेले. त्यातील ९३ टक्क्यांहून अधिक रक्कम म्हणजे जवळपास १५२४ कोटी रुपये राज्यभरातील १५.१४ लाख शेतकऱ्यांना वाटले गेले आहेत.

## शेतकरी हिताला प्राधान्य देणारी कर्जमुक्ती



राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करणारी घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६ या अंतर्गत निसर्गाची सर्व रुपे झेलत शेतात राबून आपल्यासाठी अन्न धान्य उत्पादन करणाऱ्या बळीराजाला वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागते. या बळीराजाला समर्पित अशी ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे.

आपला देश मौसमी हवामानाच्या प्रदेशात आहे आणि बदलते ऋतूचक्र आणि वेळोवेळी येणारी नैसर्गिक आव्हाने झेलत शेती करणे अतिशय कष्टाचे काम आहेच सोबतच लहरी निसर्गाने अवेळी येणारा पाऊस, अतिवृष्टी तर कधी गारपीट याने पेरलं ते उगवलं तरी त्याला बाजारपेठ मिळणं व योग्य भाव मिळणं यांच संकट त्याच्यासमोर असतं. सतत तणाव सहन करीत शेतकरी मेहनत करीत असताना आणि त्याच्या कष्टाचं मोल जाणून कर्जमुक्तीची योजना शासनाने आणली आहे. शासनाने याबाबत जे निकष लावले आहेत ते जाणून घेणे महत्वाचे आहे. यात कर्जमुक्तीची व्याप्ती अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा अशीच ठेवण्यात आली आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग या विभागांकडे याची अंमलबजावणी सोपविण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतर पध्दतीने अर्थात डीबीटी अंतर्गत याचा लाभ मिळणार आहे.

दोन लाख किंवा त्यापेक्षा कमी कर्ज असेल तर त्या शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यात कर्जाची थकीत रक्कम थेट लाभ स्वरुपात प्राप्त आहे. यासाठी त्याचे बँक खाते आणि आधार क्रमांक संलग्न असणे आवश्यक आ हे. जे शेतकरी नियमितपणे कर्जाचा हप्ता बँकेत नियमितपणे भरतात त्या सर्वांना प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे त्यानुसार अशा शेतकरी बांधवांना त्यांच्या बँक खात्यात ५० हजार रुपये प्रोत्साहन स्वरुपात दिले जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर सातत्याने शेतकरी केंद्रस्थानी ठेवत अने महत्वाचे निर्णय घेतले आहेत. आणि त्यासाठी विशेष योजना तयार करुन त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होवून याचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा असे प्रयत्न केले आहेत. आजवरच्या धोरणात्मक निर्णयामध्ये हा कर्जमुक्तीचा निर्णय शेतकऱ्यांना संकटातून सावरण्यास मदत तर करणार आहेच सोबतच यातून नवी वाट त्यांना मिळेल याचाही या निर्णयात विचार झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे. यालाही विशेष महत्व आहे.

लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन आणि ग्रामीण विकासाचा विचार करणाऱ्या आणि शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्षात हा निर्णय घेण्यात आला याला विशेष महत्व आहे.

– प्रशांत दैठणकर
प्र.उपसंचालक तथा जिल्हा माहिती अधिकारी, बीड.

## मूग लागवडीसाठी सुधारित वाण

कमी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि खतटंचाईची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी मूग पिकाकडे वळणे फायदेशीर राहू शकते. मुगाच्या लागवडीसाठी सुधारित वाणांची निवड केल्यास उत्पादनाचा धोका कमी करण्यासाठी मदत होऊ शकते. राहुरीच्या कडधान्य सुधार प्रकल्पातील तज्ज्ञांनी मुगाचे सुधारित वाण शिफारस केले आहे.

फुले सुवर्ण : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने २०२४ मध्ये प्रसारित केलेला फुले सुवर्ण हा वाण ६२ ते ७४ दिवसांत पक्क होतो. हा वाण उशिरा पेरणीसाठी योग्य असून भुरी आणि पिवळा विषाणू रोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून हेक्टरी १० ते १२ क्विंटल उत्पादन मिळू शकते. हा वाण पश्चिम महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आला आहे.

फुले चेतक : २०२१ मध्ये प्रसारित झालेला फुले चेतक हा वाण ६५ ते ७० दिवसांत तयार होतो. याचे दाणे टपोरे हिरवे असून शेंगा लांब असतात. हा वाण भुरी रोगास प्रतिकारक्षम असून १२ ते १५ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देण्याची क्षमता आहे. हा वाण संपूर्ण महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आला आहे.

उत्कर्ष (केएम-११-५८४) : हा वाण ६५ ते ७० दिवसांत पक्क होतो. टपोरे दाणे आणि लांब शेंगा ही याची वैशिष्ट्ये आहेत. भुरी रोगास मध्यम प्रतिकारक्षम असलेल्या या वाणापासून १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळू शकते.

बीएम-२००३-२ : २०१२ मध्ये प्रसारित झालेला हा वाण ६५ ते ७० दिवसांत तयार होतो. टपोरे दाणे, लांब शेंगा आणि भुरी रोगावरील प्रतिकारक्षमता ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. या वाणाची उत्पादन क्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर आहे.

पीकेव्ही एकेएम-४ : हा वाण ६५ ते ७० दिवसांत पक्क होतो. मध्यम आकाराचे दाणे आणि एकाच वेळी पक्वता येणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. या वाणापासून १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळू शकते.पीकेव्ही ग्रीन गोल्ड : विदर्भासाठी शिफारस केलेला पीकेव्ही ग्रीन गोल्ड हा वाण ७० ते ७५ दिवसांत तयार होतो. भुरी रोगास प्रतिकारक्षम असलेल्या या वाणापासून १० ते ११ क्विंटल उत्पादन मिळते. तसेच हा वाण एकाच वेळी पक्क होतो.



## फळबागेतील ओलावा टिकवण्यासाठी प्रभावी उपाय

यंदाच्या हंगामात महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता सगळेचजण करू लागले आहेत. त्यामुळे फळबागांमधील मातीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून आंबा, डाळिंब, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू यांसारख्या फळपिकांवर त्याचा थेट परिणाम दिसून येत आहे. अशा परिस्थितीत योग्य जलव्यवस्थापन आणि मातीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब केल्यास झाडांची वाढ, फळधारणा आणि उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरक्षित ठेवता येते.

फळबागेतील ओलावा टिकवणे का आवश्यक : मातीतील पुरेसा ओलावा असल्यास झाडांची मुळे सक्रिय राहतात, अन्नद्रव्यांचे शोषण योग्य प्रकारे होते आणि फळांची गुणवत्ता सुधारते. परंतु पावसाची तूट असल्यास झाडांवर ताण येतो, फुले व फळगळ वाढते, नवीन फुटवे कमी येतात आणि उत्पादनात मोठी घट होऊ शकते.

मल्चिंगचा वापर करा : फळबागेतील झाडांच्या भोवती सेंद्रिय किंवा प्लास्टिक मल्चिंग केल्याने मातीतील बाष्पीभवन कमी होते. ऊसाचे पाचट, गव्हाचा काडीकचरा, सुकलेली पाने, नारळाच्या शेंड्या किंवा गवत यांचा मल्च म्हणून वापर करता येतो. मातीतील ओलावा जास्त काळ टिकतो. तणांची वाढ कमी होते. मातीचे तापमान संतुलित राहते. मुळांची वाढ चांगली होते.



ठिबक सिंचनाचा प्रभावी वापर : कमी पाण्यात जास्त क्षेत्राला सिंचन देण्यासाठी ठिबक सिंचन हा सर्वोत्तम पर्याय आहे. ठिबकद्वारे झाडाच्या मुळाजवळ आवश्यक तेवढेच पाणी दिले जाते. त्यामुळे पाण्याची ३० ते ५० टक्के बचत होते आणि झाडांवर पाण्याचा ताण कमी होतो. आच्छादनासोबत सेंद्रिय खतांचा वापर : शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत किंवा जैविक खतांचा वापर केल्याने जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो. त्यामुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते आणि झाडांना दीर्घकाळ ओलावा उपलब्ध राहतो.

तणांचे योग्य व्यवस्थापन : फळबागेतील तण झाडांसोबत पाणी आणि अन्नद्रव्यांसाठी स्पर्धा करतात. त्यामुळे नियमित तण नियंत्रण करणे आवश्यक आहे. मात्र संपूर्ण जमीन उघडी ठेवण्याऐवजी नैसर्गिक आच्छादन राखल्यास ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

हलकी मशागत टाळा : वारंवार मशागत केल्यामुळे मातीतील ओलावा जलद गतीने कमी होतो. त्यामुळे कमी पावसाच्या काळात आवश्यक तेव्हाच मशागत करावी आणि माती शक्यतो कमी हलवावी. झाडांची छाटणी करा : अनावश्यक फांद्या कमी केल्याने झाडाचा पाण्याचा वापर कमी होतो. योग्य छाटणीमुळे झाडातील उपलब्ध पाण्याचा उपयोग फळांच्या वाढीसाठी अधिक प्रभावीपणे होतो. पावसाचे पाणी साठवा : शेततळे, चर, कंटूर बंडिंग, रिंग बेसिन किंवा रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे पावसाचे पाणी जमिनीत मुरविल्यास भूजल पातळी सुधारते आणि पुढील सिंचनासाठी पाणी उपलब्ध राहते. जमिनीची नियमित तपासणी करा : मातीतील ओलावा किती आहे हे वेळोवेळी तपासल्यास सिंचनाची योग्य वेळ ठरवता येते. गरज नसताना जास्त पाणी देणे टाळल्यास पाण्याची बचत होते आणि मुळांचे आरोग्य चांगले राहते.

कमी पावसात या चुका टाळा : भर दुपारी सिंचन करू नये. जास्त प्रमाणात रासायनिक खतांचा वापर टाळावा. झाडांच्या बुंध्याजवळ माती उकरू नये. सिंचनामध्ये अनियमितता ठेवू नये. तणांची अतिवाढ होऊ देऊ नये. हवामानातील बदल आणि अनियमित पावसामुळे फळबाग व्यवस्थापन अधिक महत्त्वाचे बनले आहे. अशा परिस्थितीत मल्चिंग, ठिबक सिंचन, सेंद्रिय खतांचा वापर, तण नियंत्रण, पावसाचे पाणी साठवणे आणि योग्य छाटणी या उपायांचा अवलंब केल्यास मातीतील ओलावा अधिक काळ टिकवून ठेवता येतो. त्यामुळे झाडांवरील ताण कमी होऊन उत्पादन आणि फळांचा दर्जा कायम राखणे शक्य होते. योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी पावसातही फळबाग यशस्वीपणे सांभाळता येते.




### महत्वाच्या घटना

१५०७ : इंग्लंड आणि नेदरलँड्स या दोन्ही देशांनी व्यापार करारावर आपली सहमती दर्शविली.
१६५९ : मुघल बादशाहा औरंगजेब यांनी दिल्ली येथे राज्याभिषेक केला.
१८४९ : डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध-पीडमाँटची लढाई दक्षिणेचा पराभव.
१९०७ : स्वामीनारायण पंथाची स्थापना.
१९१५ : डेन्मार्कमधे महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९२४ : अर्न्स्ट अलेक्झांडरसनने पहिला फॅक्स संदेश स्वतःच्या वडिलांना पाठवला.
१९५२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही सन्मान पदवी दिली.
१९५९ : सिंगापूरमधील पहिल्या सरकारची स्थापना झाली.
१९६८ : अमेरिकेच्या अध्यक्षपदचे उमेदवार रॉबर्ट एफ. केनेडी यांचा गोळी मारण्यात आली, पुढील दिवशी केनेडी मरण पावले.
१९७५ : १९६७ पासून आठ वर्षे वाहतूकीसाठी बंद असलेला 'सुवेझ कालवा' पुन्हा आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.
१९७४ : जागतिक पर्यावरण दिन
१९७७ : सेशेल्समधे उठाव झाला.
१९८० : भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक नारायण मल्हार जोशी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.
१९८४ : अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीने मंदिरावर हल्ला करण्याचा आदेश दिला.
१९८९ : चीनची राजधानी बिजींगच्या तियेनआनमेन चौकातील चळवळीदरम्यान एका अज्ञात निःशस्त्र व्यक्तीने रणगाड्यासमोर उभे राहून रणगाडा थांबवला. हे छायाचित्र या चळवळीचा मानबिंदू ठरले.
१९९४ : ब्रायन लारा यांनी नाबाद ५०१ धावा करून प्रथम दर्जाच्या क्रिकेटमध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडम स्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१८७९ : नारायण मल्हार जोशी, भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक.
१८८१ : हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)
१८८३ : ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)
१९०० : डेनिस गॅबॉर, हंगेरीयन, ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९०८ : कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया चे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)
१९४५ : अंबर रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९४६ : विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.
१९५० : हरिश्चंद्र माधव बिराजदार, मराठी पहिलवानी कुस्तीगीर.
१९६१ : भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन यांचा जन्म.
१९७२ : भारतीय पुजारी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : अमेरिकन लघुकथा लेखक ओ. हेनरी यांचे निधन.
१९१६ : लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉय.
१९४२ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील प्रतिभाशाली गझल आणि गीत गायक मास्टर मदन यांचे निधन.
१९५० : कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर २०११)
१९७३ : मा. स. गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक.
१९८७ : ग. ह. खरे, इतिहासतज्ज्ञ.
१९९६ : भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९३३)
१९९९ : राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले यांचे निधन.
२००४ : अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे निधन. (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)
२०१६ : एलिनॉर झेलियट (अमेरिकन लेखिका आणि इतिहासकार, जन्म: ८ ऑक्टोबर १९२६).
२०१७ : भारतातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्र येथून सर्वात जास्त जड वजनी ''जीएसएलव्ही मार्क -३ डी -१'' रॉकेट्? चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं.




# दिव्यांगांना कृत्रिम पायांचे वाटप; पुनर्वसन केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार होणार-जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील गांधी चमन येथील महिला रुग्णालयाच्या पाठीमागे असलेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांगांसाठी कृत्रिम पाय वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून लाभार्थ्यांना कृत्रिम पायांचे वितरण केले. या उपक्रमामुळे अनेक दिव्यांगांना नव्याने चालण्याचा आधार मिळाल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पुनर्वसन केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच त्यांनी केंद्राच्या परिसराची पाहणी करून दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम आणि सर्वसमावेशक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार असून, केंद्रासमोर दिव्यांगांसाठी सुसज्ज, सुरक्षित आणि आकर्षक उद्यान विकसित करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. रेल्वे स्थानक आणि बसस्थानकाच्या मध्यवर्ती ठिकाणी हे केंद्र असल्यामुळे जिल्ह्याच्या विविध भागांतून येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना येथे सहज पोहोचता येईल आणि विविध पुनर्वसन सेवांचा अधिक प्रभावी लाभ घेता येईल. त्यांनी पुढे सांगितले की, दिव्यांग नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून, पुनर्वसन केंद्रात आवश्यक त्या सर्व सुविधा टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येतील. दिव्यांगांच्या पुनर्वसनाबरोबरच त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात कृत्रिम पाय मिळालेल्या लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले. पुनर्वसन केंद्राच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे उपस्थित दिव्यांग, त्यांचे पालक तसेच नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# रात्रशाळेच्या साहित्यातून ७५ अनाथ आणि गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात



पाथर्डी । प्रतिनिधी

दैत्यनांदूर येथील रात्रशाळेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात शालेय साहित्याचे संकलन करण्यात आले होते रात्र शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पुरेशा साहित्याचे वाटप केल्यानंतर उरलेले शिल्लक साहित्य मागील ६ वर्षांच्या परंपरेनुसार पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील अनाथ निराधार आणि गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून एक आदर्श सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत यंदा आतापर्यंत चार वेगवेगळ्या शाळांमधील जवळपास ७५ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या उपक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी खरवंडी येथे स्थापन केलेल्या संत भगवानबाबा विद्यालयातून करण्यात आली त्यानंतर जिल्हा परिषद शाळा (मालेवाडी) माध्यमिक विद्यालय (मालेवाडी) तसेच शेवगाव तालुक्यातील पांडुरंग माध्यमिक विद्यालय (वरुर) येथील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन साहित्याचे वाटप करण्यात आले अनाथ व गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उपक्रमाबाबत बोलताना संयोजक आजिनाथ दहिफळे यांनी सांगितले की आर्थिक परिस्थितीमुळे वेळेवर शालेय साहित्य न मिळाल्यास गुणवंत मुले देखील शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाण्याची भीती असते अनाथ आणि निराधार मुलांची ही अडचण ओळखून गेल्या ६ वर्षापासून पाथर्डी-शेवगाव तालुक्यातील अशा बालकांचा शोध घेऊन त्यांना मदतीचा हात दिला जात आहे या वर्षी आतापर्यंत ७५ मुलांना साहित्य दिले असून आगामी दिवसांत परिसरातील इतर शाळांना भेटी देऊन आणखी ५० गरजू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांनाही शालेय साहित्य वाटप करण्याचा संकल्प मित्र परिवाराने केला आहे या शालेय साहित्य वाटप दौऱ्याप्रसंगी विविध शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सर्व मित्रपरिवार उपस्थित होते.

# भरधाव एसटी बसेस एकमेकांना धडकल्या ;विद्यार्थ्यांसह ३० प्रवासी गंभीर

जालना। प्रतिनिधी

वडिगोद्री महामार्गावर आज शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला आहे. अंबड तालुक्यातील शहापूरजवळ गल्हाटी नदीच्या पुलावर अंबड आगाराच्या २ एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक झाल्यानं एकच खळबळ उडाली. या भीषण अपघातात प्राथमिक माहितीनुसार ३० ते ४० विद्यार्थी व प्रवासी जखमी झाले असून, त्यामध्ये मोठ्या संख्येने शाळकरी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे जखमींना तातडीनं बाहेर काढून अंबड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं.



मिळालेल्या माहितीनुसार, १४ १७५० क्रमांकाची एसटी बस भाबेरी येथून शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन अंबडकडे येत होती. तर १४ ३०२२ क्रमांकाची दुसरी एसटी बस अंबडहून बीडकडे निघाली होती. सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास शहापूरजवळील गल्हाटी नदीच्या पुलावर दोन्ही बस समोरासमोर आल्या आणि क्षणार्धात जोरदार धडक झाली. धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले.अपघातामुळे दोन्ही बसच्या पुढील भागाचं मोठं नुकसान झालं असून, बसमधील अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले. विशेष म्हणजे शाळेसाठी प्रवास करणारे विद्यार्थीही या अपघातात जखमी झाल्याने पालकांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही बस चालकांनाही गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातानंतर बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू केलं. त्यानंतर रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि जखमींना तातडीने अंबड येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आलं. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व जखमींवर उपचार सुरू केलं असून काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर येत आहे.प्राथमिक तपासात बीडकडे जाणाऱ्या एसटी बसच्या चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, अपघाताचं नेमकं कारण काय? याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेतलं. या अपघातामुळे जालना-वडिगोद्री महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.

# कर्तृत्ववान व्यक्ती आपल्या बँकेच्या संचालक मंडळात असल्याचा सार्थ अभिमान-सतीश पंच

जालना। प्रतिनिधी

जालना पीपल्स बँकेचे संचालक लॉ. सुनील बियाणी यांना त्यांच्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत मानाचे लायन्स इंटरनॅशनल प्रेसिडेन्शियल मेडल' तसेच 'डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मेडल विथ सर्टिफिकेट व ट्रॉफी' देऊन सन्मानित आल्याबद्दल जालना पीपल्स बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने गुरुवार, दि. २ जुलै रोजी त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बँकेच्या मुख्य कार्यालयात



आयोजित या विशेष सत्कार समारंभाला बँकेचे चेअरमन सतीश पंच, व्हाईस चेअरमन किशोर देवीदान, संचालक संजय भरतीया, सुनील चौधरी, सुनंदा अग्रवाल, राजकुमार दायमा, हितेंद्र शाह, अभय करवा, जयेश बावीशी, अनुराग अग्रवाल, वर्षा भक्कड़, सुभाष वाघमारे, दीपक भूरेवाल, निखिल बाहेती, महाव्यस्थापक विजय जोशी, जाधव अणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना बँकेचे चेअरमन सतीश पंच म्हणाले की, लॉ. सुनील बियाणी यांना मिळालेला आंतरराष्ट्रीय बहुमान हा केवळ त्यांचा किंवा लायन्स क्लबचा नसून, संपूर्ण जालना शहराचा आणि आपल्या जालना पीपल्स बँकेचा गौरव आहे. अशा कर्तृत्ववान व्यक्ती आपल्या बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहेत, याचा आम्हा सर्व संचालकांना आणि बँक परिवाराला सार्थ अभिमान आहे. त्यांच्या या यशामुळे बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांची ही आंतरराष्ट्रीय कामगिरी समाजातील इतरांनाही नक्कीच प्रेरणा देईल. सत्काराला उत्तर देताना लॉ. सुनील बियाणी म्हणाले की, बँकेच्या संचालक मंडळाकडून होत असलेल्या या सत्कार सोहळ्यामुळे मला अत्यंत आनंद होत आहे.

माझ्या पाठीशी लॉयन्स परिवारासह जालना पीपल्स बँक परिवार, सर्व स्नेही आणि सहकाऱ्यांचे नेहमीच भक्कम पाठबळ राहिले आहे. बँकेकडून मिळालेले प्रेम, आपुलकी आणि ऊर्जा माझ्यासाठी अत्यंत मोलाची आहे. हा सत्कार मला भविष्यात अधिक जोमाने सामाजिक आणि व्यावसायिक कार्य करण्याची प्रेरणा देईल, असे ते म्हणाले.

# जबरी चोरीचा ६ तासात गुन्हा उघड किस ;गोंदी पोलिसांची कारवाई

जालना। प्रतिनिधी

रात्री संगम हॉटेल, गेवराईनगर (ता. अंबड, जि. जालना) फिर्यादी यांना आरोपींनी त्यांच्या चारचाकीत बसवून मारहाण करत जबरीने वाहन व इतर साहित्य हिसकावून नेले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मा. श्री. तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तात्काळ तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर परिसरातून दोन आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींकडून गुन्ह्याची कबुली मिळाल्यानंतर चोरीस गेलेली स्विफ्ट डिझायर कार, गुन्ह्यात वापरलेली आय-२० कार तसेच शने जप्त करण्यात आली.

गुरंन- १९९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता व शस्त्र अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. जप्त मुद्देमाल- गुन्ह्यात वापरण्यात आलेली आय-२० चारचाकी, चोरीस गेलेली स्विफ्ट डिझायर कार, एक लोखंडी तलवार, एक पिस्तूल व चार जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी आकाश नाना त्रिभुवन (वय २७ वर्षे), रा. संभाजीनगर , पवन प्रकाश मिरजकर (वय ३० वर्षे), रा. फिरोजराजा, छत्रपती संभाजीनगर सदरची कारवाई मा. श्री. तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक , मा. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनात. पोलीस ठाणे गोंदीच्या तपास पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# बोगस बिले दाखवून लाखो रुपयांच्या अपहार प्रकरणी चौकशीचे आदेश

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील मौजे खोराड सांवगी ग्रामपंचायत अंतर्गत मासिक मिटिंग घेवुन सुध्दा बहुमत नसतांना प्रोसिंडींग दाखवुन डी.एस.सी. लावून ग्रामपंचायत अंतर्गत निधी ग्रामपंचायतचे प्रशासक यांनी आर्थिक व्यवहार आपल्या कुटुंबियांच्या नावावर एफ.टी.ओ. द्वारे जमा केल्याप्रकरणी मंठा पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी (पंचायत) एस. पी. चव्हाण यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायत खोराड सांवगी येथील मासिक सभेत बहुमत नसताना ग्रामपंचायत अधिकारी ए टी चव्हाण व प्रशासक यांनी संगनमताने डि.एस.सी लावुन प्रशासक यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावे एफ.टी.ओ करून ३ लाख ६९ हजार रुपयाचा अपहार केल्याची तक्रार भुरा रावसु पवार व इतरांनी केली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा यांनी विस्तार अधिकारी पंचायत एस पी चव्हाण यांना चौकशीचे आदेश दिले असून चौकशी कामी दिनांक ०९/०७/२०२६ वार गुरुवार रोजी सकाळी ११. ०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय खोराड सांवगी ता. मंठा येथे अद्यावत अभिलेख्यासह उपस्थित रहावे असे आदेश ग्रामपंचायत अधिकारी ए टी चव्हाण यांना दिले आहेत. याकामी विलंब अथवा निष्काळजीपणा केल्यास होणा-या कार्यवाहीस आपण स्वतः जबाबदार असाल याची नोंद घ्यावी. असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. सदरील नोटीसची प्रत माहितीस्तव मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा), जिल्हा परिषद जालना, मा.गटविकास अधिकारी वर्ग १, पंचायत समिती मंठा यांना देण्यात आली असून श्रीमती मिलन श्रीराम जाधव, प्रशासक ग्रा.पं. खोराड सांवगी चौकशीकामी नमुद दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे. असे आदेशित करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. प्रविण आर.शिंदे, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ९८६/२०२६**

**कौसर शरिफभाई कुरेशी व इतर वि. निरंक**

**ॲड. राजेश बी. शिंदे**

अर्जदार : १. कौसर शरिफभाई कुरेशी, वय-६२ वर्षे, धंदा-मजुरी, रा.मुसलमान गल्ली, राजुरी बक, राजुरी नवगण ता.जि.बीड २. कुरेशी नसिमा कौसर, वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. राजुरी नवगण ता.जि.बीड

विरुध्द गैरअर्जदार निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नौशाद कौसर कुरेशी यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नौशाद कौसर कुरेशी हे दिनांक २०/०३/२०२६ रोजी मुर्शदपुर फाटा, तिप्पटवाडी ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ हे मयताचे वडील असुन अर्जदार क. २ ही मयताची आई आहे. मयतास अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहुं मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे नौशाद कौसर कुरेशी रा. राजुरी नवगण ता.जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १३/०८/२०२६. आज दिनांक ३०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# जांभूळवाडी जि.प.शाळा चोरीला ! शेतकऱ्याचा दावा ?

## गट नंबर ६३३ स्वतंत्र उतारा सीईओ यांच्या नावे मग शेती गट नंबर ३४ मध्ये इमारत बांधकाम केले कसे?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी येथील जांभुळवाडी ही वस्ती शाळा शाळा उघडल्याचा दिनांक १५ जून २०२६ पासून पंधरा दिवसापासून कुलूप लावल्याने बंद अवस्थेत असून विद्यार्थ्यांना जांभुळवाडी येथील रस्त्यावर बसावे लागत असल्याने संतापाची लाट निर्माण झाली असून धक्कादायक बाब म्हणजे २००० वर्षी गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर यांनी जांभुळवाडी येथील वस्ती शाळेसाठी स्वतःच्या मालकीची तीन गुंठे जागा दिली परंतु हे देत असताना गट नंबर ३४ फेरफार नंबर १९१७ जागेमध्ये बांधकाम केले ग्रामपंचायत मध्ये जांभुळवाडी वस्ती शाळेसाठी जागेचे बक्षीसपत्र हस्तांतरण करत असताना सुदाम खेडकर यांच्या पत्नी आसराबाई सुदाम खेडकर यांच्या नावे बनावट बक्षीस पत्र केल्याची माहिती आहे याचाच अर्थ जिल्हा परिषद अहिल्यानगर गट नंबर ६३३ फेरफार नंबर ६०६ गट नंबर दाखवून दुसऱ्या गट नंबर ३४ मध्ये वस्ती शाळेचे बांधकाम करून कागदपत्रांची हेराफेरी करून गट नंबर ३४ मध्ये अतिक्रमित वस्ती शाळा बांधली असल्याचे निष्पन्न झाले आहे यामुळे जांभुळवाडी वस्ती शाळेवरील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे या घटनेस जबाबदार तत्कालीन गटशिक्षणाधिकारी विस्ताराधिकारी सरपंच उपसरपंच मुख्याध्यापक हे दोषी असून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर करत आहे.

- जांभूळवाडी जिल्हा परिषद शाळेचे कायदेशीर गट नंबर ६३३ जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अहिल्यानगर स्वतंत्र उतारा निघत असून त्या जागेवर शाळेच्या इमारतीचे बांधकाम का केले नाही वास्तविक गृहस्थ सुदाम खेडकर यांच्या पत्नी आसराबाई सुदाम खेडकर स्वतःच्या मालकीच्या खाजगी शेती गट नंबर ३४ मध्ये इमारतीचे बांधकाम असल्याने तिथे शाळाच उपलब्ध नसल्याचे निष्पन्न होत आहे एकूणच जांभुळवाडी जिल्हा परिषद शाळाच चोरीस गेल्याची तक्रार सुदाम खेडकर करत असून त्याच्या खाजगी शेती गट नंबर ३४ येथे अतिक्रमित बांधकाम असून वीस वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून त्याचे शेतीचे उत्पन्न घेता न आल्याने आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी सुदाम खेडकर करत आहेत.

- भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे २००३ चे कलम १६८ प्रमाणे पाथर्डी पोलिसांनी शेतकरी सुदाम खेडकर यांना नोटीस पाठवून शाळेचे कुलूप न उघडल्यास सरकारी कार्यास अडथळा निर्माण करणे सार्वजनिक हितास बाधा निर्माण करणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कावर परिणाम करणे व कायदा व सुव्यवस्था बिघडवणे अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची नोटीस पाठवली आहे परंतु शेतकरी सुदाम खेडकर यांनी नोटीस न स्वीकारता आपल्याला न्याय मिळेपर्यंत लढा चालूच ठेवणार असल्याचे सांगितले आहे.

# शेतकऱ्यांना कर्जाच्या लाभापर्यंत व्याज आकारणी नाही

बीड । प्रतिनिधी

शेतकरी वर्गाचा विचार प्राधान्याने करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ची घोषणा झाली. यासोबतच या योजनेचा लाभ पुर्णपणे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात प्राप्त व्हावा आणि यात बँकांची भूमिका महत्त्वाची ठरविण्याचाही निर्णय झालेला आहे. यात उल्लेखनीय बाब म्हणजे लाभ मिळेपर्यंत व्याजाची आकारणी बँकांनी करू नये, असाही निर्णय झाला आहे.

शेती कर्जासाठी मध्यवर्ती बँका तसेच सहकारी बँका यांना स्पष्ट आदेश देणारा शासन निर्णय ही काढण्यात आला आहे. ३० जून २०२५ या तारखेपर्यंत थकीत असलेली आणि मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीक कर्जे या अंतर्गत विचारात घेतली आहेत. यात पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना ०२ लाख रूपयांची कर्जमाफी मिळणार आहे. ज्यांचे कर्ज ०२ लाखांहून अधिक आहे अशांनी ०२ लाखांपेक्षा अधिक असणाऱ्या कर्जाच्या रकमेचा भरणा केल्यावर त्यांना याचा लाभ मिळणार आहे. ज्यांचे कर्ज ०२ लाखांपेक्षा अधिक आहे त्या सर्व शेतकऱ्यांनी तातडीने वरील रक्कम भरणे आवश्यक आहे. याची नोंद घेऊन त्यांना पात्र लाभार्थी होण्याची प्रक्रिया प्रथम पार पाडावी लागणार आहे. या



कर्जमुक्ती योजनेत अल्पमुदत पीक कर्ज तसेच पुनर्गठीत पीक कर्ज याचाही समावेश असल्याने बँकांच्या पातळीवर सर्व माहिती गोळा करून ती अपलोड केली जाईल आणि त्यानंतर हा लाभ शेतकऱ्याच्या बँक खात्यात येईल. या योजनेचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे जे शेतकरी पीक कर्ज घेतात आणि त्याची परतफेड नियमितपणे करीत आहेत त्या शेतकऱ्यांना देखील प्रोत्साहन स्वरूपात ५० हजार रूपये बँक खात्यात मिळतील अशा लाभार्थ्यांची संख्या देखील खुप मोठी आहे. आता पावसाला सुरूवात झाली आहे आणि खरीप पेरण्यांना देखील सोबतच प्रधानमंत्री फसल विमा योजना माह देखील सुरू झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एकूणच लगबग दिसत आहे, त्याच लगबगीत लाभ मिळणार असल्याने शेतकऱ्यांना याचा फायदा मोठ्या प्रमाणावर होणार हे नक्की.

# बीड जि.प.च्या शिक्षण विभागात केंद्रप्रमुख पदोन्नतीला कात्रजचा घाट

## कृष्णा अंडीलसह अनेक जण अडचणीत ; चौकशी करण्याचे दिले आदेश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप आ. रत्नाकर गुट्टे यांनी केला आहे. या प्रकरणाची व्याप्ती पाहता, शासनाने या संपूर्ण प्रकरणाची एस.आय.टी. मार्फत उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या विषयावर शासनाने तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाने बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

आ. रत्नाकर गुट्टे यांनी महाराष्ट्र विधानसभेत नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना मांडली असून, त्यामध्ये शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत:

नियमांना हरताळ: राज्यभरात पदोन्नती प्रक्रिया राबविली जात नसतानाही बीड जिल्हा परिषदेने ही प्रक्रिया राबविण्याचा घाट घातला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही शिक्षण विभागाने संपूर्ण यंत्रणा कामाला लावली होती.




सेवाज्येष्ठता यादीतील संशयास्पद बाबी: २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या सेवाज्येष्ठता यादीवर कोणताही जावक क्रमांक नाही. शिवाय, काही शिक्षकांच्या सेवा कालावधीच्या तारखांमध्ये फेरफार केल्याचा आरोप आहे. एकाच शिक्षकावर मेहरबानी: संपूर्ण आटापिटा केवळ अंडील कृष्णा शिवाजी या एकाच शिक्षकासाठी केला जात असल्याचा दावा सूचनेत केला आहे. या शिक्षकाची नियुक्ती आणि पदवीधर पदावरील पदोन्नती प्रक्रियेतील संशयास्पद वेळेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. अपत्र ठरलेल्या शिक्षकाची निवड: राज्याबाहेरील विद्यापीठांच्या (अलाहाबाद विद्यापीठ) बी.एड. पदवीधारकांना नियुक्ती देण्यास स्पष्ट मनाई असतानाही, सदर शिक्षकाची केंद्रप्रमुख पदासाठी निवड करण्यात आली आहे. शिक्षकांना डावलण्याचा प्रयत्न: आक्षेप नोंदवण्यासाठी दिलेल्या मुदतीत सलग चार दिवस सुट्ट्या होत्या, ज्यामुळे इतर शिक्षकांना आक्षेप घेण्याची संधीच मिळाली नाही. या अनियमिततेच्या विरोधात शिक्षकांनी ९ मार्च २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. या गंभीर तक्रारींची दखल घेत ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेकडे अद्यावत वस्तुस्थितीसह स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविला आहे. तसेच, या विषयावर ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांना विधानसभेत निवेदन सादर करायचे असल्याने, प्रशासकीय पातळीवर मोठी खळबळ उडाली आहे

## किराणा दुकानांत चोरी करणाऱ्या अल्पवयीन टोळीचा शिवाजीनगर पोलिसांकडून पर्दाफाश

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील किराणा दुकानांमध्ये चलाखीने चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या टोळीचा शिवाजीनगर पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून टोळीतील इतर सदस्यांची महत्त्वाची माहिती समोर आली आहे.**

प्राथमिक तपासात असे निष्पन्न झाले की, हा अल्पवयीन मुलगा १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचा गट तयार करून चोरी करायचा. चोरीसाठी तो अशा मुलांची निवड करायचा ज्यांच्याकडे पालकांची मोटारसायकल उपलब्ध असे. दुकानात शिरल्यावर हे मुले दुकानदाराला वस्तू आणण्यासाठी मागील भागात पाठवायचे. दुकानदार मागे जाताच, मुख्य सूत्रधार मुलगा गल्ला उघडून रोख रक्कम चोरून आपल्या साथीदारांसह मोटारसायकलवरून पसार व्हायचा.

पोलीस पथकाची धडाकेबाज कामगिरी

या प्रकरणाचा तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केला. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, स.पो.नि. गुंजाळ मॅडम आणि डी.बी. पथकातील बाळकृष्ण राहडे, सुदर्शन ठोसर, अनंत गिरी, सचिन आगलावे व अनिल घटमळ यांनी ही कारवाई पूर्ण केली. ताब्यात घेतलेल्या बालकाच्या चौकशीतून चोरीत सहभागी असलेल्या आणखी तीन ते पाच अल्पवयीन मुलांची माहिती पोलिसांना मिळाली असून, त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे शहरातील चोरीच्या घटनांचा उलगडा झाला आहे. दरम्यान, शिवाजीनगर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात काही संशयास्पद आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

## अंमली पदार्थांविरुद्ध मोठी कारवाई; ४९ किलो गांजासह २९.५४ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी अटकेत

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने अंमली पदार्थांविरुद्ध एक मोठी धडक कारवाई करत ४९ किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे २९ लाख ५४ हजार १६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन आरोपींना अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, धर्मापुरी (ता. परळी) शिवारामधून एका लाल रंगाच्या कारमधून अमली पदार्थांची



(गांजा) वाहतूक होणार आहे. या माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखा आणि परळी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने धर्मापुरी शिवारातील अहमदपूर-अंबाजोगाई रोडवर सापळा रचला.

यावेळी संशयित मारुती सुझुकी ब्रेझा कारची तपासणी केली असता, त्यात ४९ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी एकूण २९,५४,१६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी अनिल बिभीषण फड (वय २५) आणि अरबाज युसूफ सय्यद (वय २३, दोघेही रा. धर्मापुरी, ता. परळी) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी हा गांजा ईश्वर नवनाथ फड आणि श्रीकांत भास्कर फड (दोघेही रा. धर्मापुरी) यांच्या सांगण्यावरून आणल्याची कबुली दिली. या चौघांविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३२७/२०२६, कलम ८(क), २०(ब)(ळळ)(क) एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी दोन ◀◀ पान ३ वर

## नागपूरला पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीला शिवाजीनगर डीबी पथकाने शोधले

बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पळवून नेलेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात स्थानिक पोलिसांच्या डीबी पथकाला मोठे यश मिळाले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नागपूर गाठून अल्पवयीन मुलगा व मुलगी या दोघांना सुखरूप ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी शाळेत ये-जा करत असताना एका अल्पवयीन मुलाकडून तिचा वारंवार पाठलाग केला जात होता. यातून दोघांची ओळख झाली आणि नंतर ते दोघेही घरातून निघून गेले. पालकांनी तात्काळ शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी तात्काळ एक विशेष पथक तयार केले. या पथकाने तांत्रिक तपास आणि विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून दोघांचे लोकेशन नागपूर येथे असल्याचे निश्चित केले. त्यानंतर पोलीस पथकाने नागपूरला जाऊन दोघांनाही सुरक्षित ताब्यात घेतले आणि बीडला आणले. आवश्यक कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून दोघांनाही त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉँवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली ◀◀ पान ३ वर

## अटल अमृत पाणीपुरवठा योजनेप्रकरणी हायकोर्टाकडून दखल; संबंधितांना नोटिसा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील ११४ कोटी रुपयांच्या अटल अमृत पाणीपुरवठा योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते सय्यद सादेक यांनी दाखल केलेल्या याचिकेची छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. याचिका स्वीकारून संबंधित अधिकारी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.



याचिकेनुसार, सुमारे ११४ कोटी रुपयांची योजना असूनही जवळपास १०० कोटी रुपये खर्च झाल्यानंतरही बीड शहरातील नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींना ◀◀ पान ३ वर

## पोलीस पाटील नियुक्तीप्रकरणी उप विभागीय दंडाधिकाऱ्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची नोटीस

माजलगाव । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील पोलीस पाटील पदावरील नियुक्तीप्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, संभाजीनगर यांनी उप विभागीय दंडाधिकारी, माजलगाव यांना नोटीस बजावली असून या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार आहे.



चिखलबीड येथील पोलीस पाटील पदासाठी करण्यात आलेल्या नियुक्तीमध्ये संबंधित उमेदवाराचे आजोबा पूर्वी पोलीस पाटील होते, या आधारावर त्यांचा नातू सूर्यकांत मुंडे यांना नियुक्ती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, आजोबा पोलीस पाटील असल्याचा लाभ नातवास कायद्यानुसार देता येत नसल्याने ही नियुक्ती बेकायदेशीर असल्याचा दावा अर्जदार शिवाजी मुंडे यांनी केला आहे. या नियुक्ती आदेशाला आव्हान देत शिवाजी मुंडे यांनी ॲड. महेश भोसले यांच्यामार्फत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, संभाजीनगर येथे मूळ अर्ज दाखल केला आहे. प्राथमिक सुनावणीदरम्यान न्यायाधिकरणाने अर्जातील मुद्द्यांची दखल घेत उप विभागीय दंडाधिकारी, माजलगाव यांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी होणार असून न्यायाधिकरणासमोर संबंधित नियुक्तीची कायदेशीरता तपासली जाणार आहे. या प्रकरणाकडे परिसरातील नागरिकांसह पोलीस पाटील नियुक्ती प्रक्रियेशी संबंधित घटकांचे लक्ष लागले आहे.

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी संतप्त मातंग समाजाची आष्टी पोलीस ठाण्यावर धडक

आष्टी । प्रतिनिधी

साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे आणि आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे या महापुरुषांबाबत सोशल मीडियावर सातत्याने अवमानकारक पोस्ट करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी आझाद क्रांती सेनेच्या नेतृत्वाखाली आणि समस्त मातंग समाजाच्या वतीने आष्टी पोलीस ठाण्यात शुक्रवारी (३ जुलै) लेखी




तक्रार दाखल करण्यात आली.

तक्रारीत संबंधित व्यक्तीने जाणीवपूर्वक महापुरुषांचा अपमान करून मातंग समाजाच्या भावना दुखावल्या असून, दोन समाजांमध्ये वैमनस्य पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या आक्षेपार्ह पोस्टमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्यामुळे संबंधितावर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १९६, २९९, ३५२, ३५३ अंतर्गत तातडीने गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. ◀◀ पान ३ वर

## वन महोत्सवानिमित्त सामाजिक वनीकरण परिक्षेत्र सवलतीच्या दरात रोपविक्री स्टॉलचे उद्घाटन

### पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवडीचे आवाहन; ३० सप्टेंबरपर्यंत विविध प्रजातींची रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध

माजलगाव । प्रतिनिधी

वन महोत्सवानिमित्त सामाजिक वनीकरण परिक्षेत्र माजलगाव यांच्या वतीने शुक्रवार दि. ३ जुलै २०२६ रोजी सवलतीच्या दरात रोपविक्री स्टॉलचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रात वाढ आणि वृक्षलागवडीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.




हा उपक्रम विभागीय वनाधिकारी सामाजिक वनीकरण बीड श्री. एस. एल. लखमावड तसेच सहाय्यक वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, बीड श्री. यू. एम. बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. स्टॉलवर विविध प्रकारची फळझाडे, सावलीची झाडे, औषधी वनस्पती तसेच इतर विविध प्रजातींची दर्जेदार रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

शेतकरी, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती तसेच सर्वसामान्य नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुकांनी दि. १५ जून ते ३० सप्टेंबर २०२६ या ◀◀ पान ३ वर

## अवैध वाळू वाहतूक करणारा दहा लाखांचा पिकअप जप्त

गेवराई । प्रतिनिधी

अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी दिलेल्या आदेशानुसार, गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई करत अवैध वाळू वाहतूक करणारा अशोक लेलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप जप्त केला आहे. या कारवाईत एकूण १० लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ३ जुलै २०२६ रोजी पोलीस पथक गेवराई शहरात आणि परिसरात गस्त घालत होते.




यादरम्यान, १ जुलैच्या रात्री आणि २ जुलैच्या पहाटे ५:०० वाजेच्या सुमारास कोल्हेर रोडवर एक विना नंबरचा काळा-पांढऱ्या रंगाचा 'बडा दोस्त' पिकअप संशयास्पदरीत्या मिळून आला. या वाहनातून कोणत्याही परवान्याशिवाय वाळूची चोरी करून विक्रीसाठी वाहतूक केली जात होती.

पोलीस पथकाची कारवाई

पोलिसांनी तात्काळ वाहन आणि चालकाला ताब्यात घेतले. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास ◀◀ पान ३ वर

## हरीशभाई खिलोशिया यांना आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आंतरभारती शाखा, अंबाजोगाई यांच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'स्नेहसंवर्धन पुरस्कार' यावर्षी अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध तृप्ती स्वीट होमचे संचालक हरीश चुनीलाल खिलोशिया यांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



पुरस्काराचे हे १३ वे वर्ष आहे. २०१४ साली पहिला पुरस्कार प्रचार्य डॉ बी आय खडकभावी यांना देण्यात आला होता. सन २०२५ चे स्नेहसंवर्धन पुरस्कार विजेते डॉ राजमान्य सर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार असून, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आंतरभारतीचे राष्ट्रीय विश्वस्त अमर हबीब व आंतरभारती, पुणेच्या कार्याध्यक्ष सविता कुरुंदवाडे उपस्थित राहणार

## पोलिसांकडून ६६ गुन्ह्यांतील जप्त मुद्देमालाची विल्हेवाट

गेवराई । प्रतिनिधी

येथील पोलीस ठाण्याकडून कायदेशीर प्रक्रियेचे पालन करत मागील दोन वर्षांपासून जप्त असलेला ६६ गुन्ह्यांतील मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे. ही कारवाई न्यायालयाच्या आदेशानुसार पार पडली.

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी पोलीस ठाणे स्तरावर प्रलंबित असलेला जप्त मुद्देमाल कायदेशीररीत्या नष्ट करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार, अपर पोलीस



अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी ही मोहीम राबवली. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26